सन १९०७

म. ग्रं. सं. ठाणें

विषय इतिहास

सं. क्र. २९

REFBK-0000383

REFBK-0000383

म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
नं. २२

# महाराष्ट्राचा बालबोध इतिहास.

लेखक

वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

किंमत ३ आणे.

गोष्टींच्या रूपानें सांगितलेला

महाराष्ट्र देशाचा

# बालबोध इतिहास.

भाग १ ला.

## मराठे राजे

लेखक

383
REFBK-0000383
REFBK-0000383

### वासुदेव गोविंद आपटे बी. ए.

संपादक ' आनंद. '

१९०७.

किंमत ३ आणे.

हें पुस्तक पुणें येथें रावजी श्रीधर गोंधळेकर यांचे
' जगद्धितेच्छु ' छापखान्यांत वासुदेव गोविंद
आपटे यांनीं छापून सदाशिवपेठ
नं० ६३८ येथें प्रसिद्ध केलें.

---:*:---

( सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें सर्व हक्क ग्रंथ-
कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

मराठ्यांच्या तेजस्वी इतिहासाची खरी माहिती मनोरंजक गोष्टींच्या द्वारें महाराष्ट्रांतल्या लहान मुलांना व मुलींना करून द्यावी अशा सूचना पुणें, सातारा, नागपूर, मुंबई, वगैरे ठिकाणच्या आनंदाच्या वाचकांकडून आणि कित्येक विद्वान् गृहस्थांकडून मला वारंवार करण्यांत आल्या आणि घरीं पुतण्यास मराठ्यांचा इतिहास शिकवितांना अशा प्रकारच्या गोष्टींच्या पुस्तकाची आवश्यकता मला स्वतःलाही दिसून आली. त्यावरून मीं यथामति हें पुस्तक तयार केलें आहे. याचा उपयोग करून पालक व शिक्षक आपला अनुभव कळवितील तर पुढल्या आवृत्तीचे वेळीं सुधारणा करतां येईल.

इतिहास ह्मणजे काय, व आपण मराठ्यांचा इतिहास आधीं कां शिकावा वगैरे कित्येक महत्वाच्या मुद्दयांच्या गोष्टी मुलांच्या कोंवळ्या मनावर सोप्या शब्दांनीं ठसविण्याचा यत्न ‘ आरंभींचे दोन शब्द ’ या प्रकरणांत केला आहे. हें प्रकरण मुलांना अगोदर नीट समजावून दिल्यानंतर मग एकेक गोष्ट रोज त्यांचेकडून वाचवून घेतली असतां एका महिन्यांत मराठे राजांचा इतिहास खेळत खेळत मुलांना येऊं लागेल अशी उमेद आहे.

या गोष्टी लिहिण्याचे कामीं कित्येक अनुभवी आणि विद्वान् शिक्षकांनीं उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे व पुस्तक लवकर आणि चांगलें छापून दिल्याबद्दल 'जगद्धितेच्छु' छापखान्याचे चालक व मालक रा. केशव रावजी गोंधळेकर यांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

आनंद-कार्यालय.
पुणें, ता. ७।२।०७ } वा. गो. आपटे.

# अनुक्रमणिका.


| विषय | | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| | आरंभींचे दोन शब्द .... .... .... .... | १ |
| गोष्ट | १—महाराष्ट्र आणि मराठे .... .... .... | ६ |
| ,, | २—मालोजी व शहाजी भोसले .... .... | १० |
| ,, | ३—बाल शिवाजी .... .... .... .... | १६ |
| ,, | ४—वीर शिवाजी .... .... .... .... | १९ |
| ,, | ५—चंद्रराव मोरे .... .... .... .... | २२ |
| ,, | ६—विजापुरचा वाघ .... ... ... ... | २३ |
| ,, | ७—बाजी प्रभूचा पराक्रम ... ... ... | २७ |
| ,, | ८—फिरंगोजीची स्वामिभक्ति ... ... | २९ |
| ,, | ९—'ये आदमी नही, बडा सैतान है' ... | ३१ |
| ,, | १०—राजा शिवाजी ... ... ... ... | ३२ |
| ,, | ११—मुरारबाजीचा पराक्रम ... .... .... | ३४ |
| ,, | १२—बादशहाची दगलबाजी .... .... .... | ३६ |
| ,, | १३—जवानमर्द तानाजी मालुसरे .... .... | ३८ |
| ,, | १४—श्री छत्रपति शिवाजी महाराज .... .... | ४२ |
| ,, | १५—छत्रपति संभाजी .... .... .... | ४६ |
| ,, | १६—छत्रपति राजाराम .... .... .... | ४८ |
| ,, | १७—छत्रपति दुसरा शिवाजी .... .... .... | ५१ |
| ,, | १८—छत्रपति शाहू .... .... .... .... | ५३ |
| ,, | १९—छत्रपति शाहूचे वंशज ... ... ... | ५६ |

# मुलांनीं वाचण्याजोगीं पुस्तकें.

१ बालरामायण ( सचित्र ) .... .... किंमत ३ आणे
२ बालभारत .... .... .... .... „ ५ „
३ भारतांतील सोप्या गोष्टी .... .... „ १० „
४ मौजेच्या गोष्टी .... .... ... „ ३ „
५ रामायणांतल्या गोष्टी ... ... „ ५ „
६ बालबोध इतिहास भाग १ ( सचित्र ) „ ३ „

तयार होत आहे.

७ बालबोध इतिहास भाग २
—पेशवाईची हकीकत ( सचित्र )

पा. ६

गोष्टींच्या रूपानें सांगितलेला

# महाराष्ट्राचा बालबोध इतिहास.

## आरंभींचे दोन शब्द.

माझ्या बालमित्रांनों, इतिहास हा विषय तुम्हांस शाळेंत शिकावयाचा असतो आणि तुम्हीं तो शिकावा हें अगदीं योग्य आहे. कां ? त्याचीं कारणें मी लवकरच सांगणार आहें. तथापि आतां येथें ऐवढेंच सांगतों कीं, हा विषय अतिशय मौजेचा आहे. तुम्हांला गोष्टी ऐकण्याची आवड व नाद आहेच. इतिहास हा सगळा गोष्टींनींच भरलेला आहे. भारत, रामायण किंवा पुराणें यांतल्या गोष्टींच्या सारख्याच इतिहासांतल्याही गोष्टी मौजेच्या आहेत. मात्र त्या अलीकडच्या काळांतल्या आहेत. पुराणांत ऋषींच्या भयंकर शापांच्या, माणसांना खाऊन टाकणाऱ्या अक्राळ विक्राळ स्वरूपाच्या राक्षसांच्या, आणि ज्यांत माणसांच्या रक्ताचे पूर वाहले अशा भयंकर युद्धांच्या कथा आहेत. इतिहासांतही राजांनीं प्रजेला गांजल्याच्या, क्रूर व दुष्ट लोकांनीं स्वाऱ्या करून व लोकांच्या जवळचा पैसा लुटून त्यांना दुःख दिल्याच्या, व शेंकडों—किंबहुना हजारों—माणसांना लढाईंत ठार मारून देशचे देश

उजाड केल्याच्या गोष्टी आहेत. याच्या उलट, पुराणांत जशा कांहीं गोष्टी फार चांगल्या आहेत, तशा इतिहासांतही आहेत.

आपण जेथें जन्मलों, किंवा जेथें वरदार करून राहतों, तो आपला देश. मनुष्याला आपलें स्वतःचें वर जसें आवडतें—आवडतें इतकेंच नाहीं, तर त्याविषयींचा त्याला थोडाबहुत अभिमानही वाटतो—तसा आपला देशही आपणा प्रत्येकाला आवडला पाहिजे व त्याच्या विषयीं योग्य अभिमानही वाटला पाहिजे. एका कुटुंबांत राहणारे सगळे जसे आप्त, तसे आपल्या हिंदुस्थान देशांत राहणारे व हिंदुस्थानाला आपला देश—आपली जन्मभूमि—आपली माता—समजणारे ते सगळे आपणांस भावांबहिणींसारखे होत. त्यांच्यावर आपण प्रेम केलें पाहिजे. आपल्या भावांबहिणींसंबंधानें कोणीं वाईट शब्द उच्चारले तर आपणांस चीड येते; त्यांना कोणीं दुखविलें तर मनस्वी राग येऊन दुःख देणारांस चांगली शिक्षा करण्याचें आपल्या मनांत साहजिक येतें आणि प्रसंगीं स्वतःच्या जिवाचीही परवा न करतां आपण आपल्या भावांबहिणींच्या मदतीला धांवून जातों; तसेंच देशाच्या संबंधानें जे कोणी आपले भाऊ किंवा ज्या कोणी आपल्या बहिणी आहेत, त्यांना दुसऱ्यांनीं त्रास दिलेला दिसतांच स्वतःच्या सुखदुःखांकडे न पाहतां कित्येक थोर माणसांनीं मोठाले पराक्रम केले आहेत व त्यावरून त्यांचा लौकिक गोष्टींच्या

रूपानें त्यांच्या मागें आज शेंकडों वर्षें इतिहासांत राहिला आहे. सारांश, इतिहासांत चांगल्या वाईट सगळ्या प्रकारच्या गोष्टी आहेत, आणि त्या सगळ्यांपासून आपणांस थोडाबहुत बोध घेतां येण्यासारखा आहे. अशा गोष्टी कोणास ऐकाव्याशा किंवा वाचाव्याशा वाटणार नाहींत? तसेंच आपण अज्ञान, दुर्बळ, किंवा सुधारणेंत अगदीं मागसलेले लोक आहों, आपल्या हातून देशाचें कल्याण काय होणार आहे? किंवा मोठा नांवलौकिक मिळण्यासारखें एखादें कृत्य करण्याची शक्ति आपले अंगीं काय आहे? असे नेभळे विचार कित्येकांच्या मनांत केव्हां केव्हां येतात; पण इतिहासांतल्या गोष्टी नीट लक्ष देऊन ऐकिल्या आणि त्यावर थोडासा विचार केला, ह्मणजे आपलें आपणांलाच वाटूं लागतें कीं आपल्या हातून कांहीं होणार नाहीं असें ह्मणून नाउमेद होऊन बसणें ही अगदीं चूक आहे. आपण आपल्या शक्तीप्रमाणें देशाविषयींचें आपलें कर्तव्य केलें, आणि हातीं घेतलेल्या पवित्र कार्यांत ईश्वर आपणांस खात्रीनें यश देईल असा मनांत भरंवसा बाळगून नेटानें उद्योग केला, ह्मणजे अगदीं सामान्य माणसाच्या हातून सुद्धां मोठालीं अचाट कृत्यें घडतात. या निवळ गप्पा नाहींत. अशा प्रकारचीं उदाहरणें इतिहासांत एक नाहीं, दोन नाहींत, शेंकडों घडलेलीं आढळतात. मी ज्या गोष्टी तुह्मांला आतां सांगणार आहें, त्यांत अशा गोष्टी येणारच आहेत.

तुह्मीं कदाचित् ह्मणाल कीं, आह्मांला बाकीच्या गोष्टी न सांगतां अशा गोष्टी तेवढ्या वेंचून काढून सांगा. तसें करतां आलें असतें तर चांगलें झालें असतें; पण तें कसें व्हावें? ज्याला सबंध इतिहास शिकावयाचा आहे—ज्याला आपल्या देशाची खडान् खडा माहिती पाहिजे आहे—त्याला नुसत्या निवडक गोष्टी ऐकून कसें चालेल? अशानें सबंध इतिहास त्याला कधींच कळावयाचा नाहीं. आणखी समजा, एखाद्यानें ह्मटलें कीं आह्मांला रामायणांतली रामाची तेवढी कथा सांगा; पण दशरथानें त्याला वनवासास पाठविल्याची, रावणानें सीतेला हरण करून नेल्याची किंवा मारुतीनें लंका जाळल्याची वगैरे कथा आह्मांला नकोत; तर अशा माणसाला रामायणांतली सबंध कथा सांगणारानें तरी कशी सांगावी? आपल्या देशांत पूर्वी जें काय बरें वाईट घडलें, त्या सर्वांची माहिती आपण करून घ्यावी हें चांगलें. अशी जी संपूर्ण माहिती तिलाच इतिहास ह्मणतात. आपण मराठे ह्मणजे महाराष्ट्रांतले राहणारे; अर्थात् आपणास दुसऱ्या देशाचा इतिहास शिकण्यापूर्वी आपल्या स्वतःचा ह्मणजे मराठ्यांचा इतिहास शिकावयास पाहिजे ह्मणून तोच प्रथम हातीं घेऊं.

पण थोडा दम धरा; आणखी एकच गोष्ट सांगावयाची राहिली आहे आणि तेवढी येथें सांगून टाकणें अवश्य आहे. तुमच्यापैकीं कित्येक कदाचित् ह्मणतील कीं आह्मी ब्राह्मण, प्रभु, सोनार. किंवा शिंपी आहों; आह्मांला मरा-

ल्यांचा इतिहास शिकून काय करावयाचें आहे? भोसले, निंबाळकर, गाइकवाड, शिर्के, जाधव वगैरे मराठे जातींच्या मुलांनीं पाहिजे तर तो शिकावा; पण मीं वर सांगितलेंच आहे कीं, इतिहासांत 'मराठे' ह्या शब्दाचा अर्थ 'महाराष्ट्रांत राहणारे' असा घेतात. मराठ्यांची जात तेवढेच मराठे नाहींत. तसें नसतें तर पेशवे, होळकर, पटवर्धन, रास्ते, गोखले, समशेर बहादर, वगैरे घराण्यांना 'मराठे सरदार' असें कोणीं ह्मटलें नसतें, आणि या सरदारांनाही मराठी राज्याचा जो मोठा अभिमान वाटत असे तो वाटला नसता. मराठ्यांत तुह्मी आह्मी महाराष्ट्रांत राहणारे, व मराठी भाषा बोलणारे सगळे आलों. जातीनें आपण ब्राह्मण, कुणबी, शिंपी, सुतार, कोणी असलों, तरी इतिहासाच्या दृष्टीनें आपण सगळे एकाच वर्गांतले—मराठे—आहों हें अगदीं पक्कें लक्षांत ठेवा आणि आमचा व मराठ्यांचा काय संबंध? व त्यांचा इतिहास ऐकून आह्मांला काय करावयाचें आहे? असा वेडगळ प्रश्न पुनः करूं नका. मराठ्यांचा इतिहास ह्मणजे आपल्या महाराष्ट्राचा इतिहास. तो दुसऱ्या कोणाचा नाहीं; आपलाच आहे. तो ऐकावा कीं नाहीं असें विचारणें ह्मणजे आपल्या वाडवडिलांची माहिती आपण करून घ्यावी कीं नाहीं, अशी शंका घेण्यासारखें वेडेपणाचें आहे. आणखी दुसरें असें कीं, गमतीच्या व बोधपर गोष्टी कोणत्याही देशाच्या किंवा जातीच्या असल्या ह्मणून त्या

ऐकण्यास व त्यांच्यापासून जें काय शिकण्यासारखें असेल तें शिकण्यास आपलें काय वेंचतें? मधमाशी मध गोळा करतांना अमक्याच एका जातीच्या फुलांतला मध घेते, दुसऱ्या जातीच्या फुलांतला नाहीं, असें कधीं झालें आहे काय? मधमाशीसारख्या क्षुद्र प्राण्याचे अंगीं जें शहाणपण आहे तें सुद्धां बुद्धिवान् ह्मणविणाऱ्या माणसाचे अंगीं नसावें व ती जो वेडेपणाचा भेदभाव मनांत ठेवीत नाहीं, तो शहाण्यासुर्त्या माणसांनीं ठेवावा हें त्यांस शोभतें काय?

इतिहास ह्मणजे काय? तो आपण कां शिकावा? आपण कोण? आपला इतिहास कोणता व मराठ्यांचा आणि आपला संबंध कशा प्रकारचा आहे? या प्रश्नांचा थोडासा खुलासा महाराष्ट्राचा इतिहास सांगूं लागण्यापूर्वींच करणें अवश्य होतें. तो खुलासा येथवर केला, तेव्हां आतां एकदम गोष्टींनाच सुरुवात करतों.

## गोष्ट १ ली–महाराष्ट्र आणि मराठे.

बंगाली भाषा बोलणारांचा जो देश तो बंगाल; गुजराथी बोलणारांचा तो गुजराथ; तेलगू भाषा बोलणारांचा तो तेलंगण; कानडी बोलणारांचा तो कर्नाटक; तसा मराठी भाषा बोलणारांचा देश तो महाराष्ट्र होय.

साधारणपणें तापी व तुंगभद्रा या दोन नद्यांच्या मधल्या प्रदेशाला महाराष्ट्र असें ह्मणतात. या प्रदेशांत पुणें, सातारा, नगर, नासिक, सोलापूर यासारखीं शहरें वसलेलीं आपण पाहतों. पण याच ठिकाणीं तीन चार हजार वर्षांपूर्वी एक मोठें भयाण अरण्य होतें, आणि ज्या ठिकाणीं सध्यां आपण टोलेजंग वाडे व मंदिरें पाहतों, ज्या ठिकाणीं हल्लीं लाखों रुपयांच्या मालाची देवघेव नेहमीं चाललेली दिसते, किंवा जेथें नाटकें, तमाशे, शर्यती वगैरे करमणुकीच्या गोष्टी चालतांना आढळतात, तेथें पूर्वी नुसत्या गर्जनेंनेंच माणसांना घाबरवून सोडणाऱ्या वाघासारख्या भयंकर व क्रूर पशूंच्या गुहा, आणि लांडगे, कोल्हे, वनगाई, वगैरे जंगली प्राण्यांच्या राहण्याच्या जाळ्या असत असें एखाद्याला सांगितलें, तर तें त्याला खरें सुद्धां वाटणार नाहीं; पण खरें वाटो अगर न वाटो, रामायणांत दंडकारण्य ह्मणून जें सांगितलें आहे तें याच ठिकाणीं होतें असें पुष्कळ मोठमोठ्या विद्वानांनीं शोध करून ठरविलें आहे. या ठिकाणीं हळू हळू माणसांची वस्ती झाल्यावर राष्ट्रिक किंवा रट्ठे नांवाचे लोक येथें राहूं लागले. तेच मोठे ह्मणजे प्रबळ झाल्यावर स्वतःला 'महाराष्ट्रिक' (मोठे राष्ट्रिक) किंवा महारट्ठे (मराठे) ह्मणवूं लागले, आणि त्यावरून या देशाला 'महाराष्ट्र' आणि लोकांना मराठे असें नांव मिळालें.

आज या देशावर इंग्रजांचें राज्य आहे; त्यापूर्वी आ-

पल्या मराठ्यांचें होतें; त्याच्या पूर्वी मुसलमानांचें होतें; त्यांच्या अगोदर मराठ्यांचेंच राज्य होतें. याप्रमाणें या देशावर आजपर्यंत अनेकांनीं राज्य केलें आहे. अगोदर शालिवाहन नांवाचे राजे झाले; पुढें चालुक्य वंशांतले राजे होऊन गेले; नंतर राष्ट्रकूट नांवाचे राजे राज्य करूं लागले. वेरूळचीं प्रसिद्ध लेणीं पुष्कळांनीं पाहिलीं असतील; निदान त्यांचें वर्णन वाचलें असेल किंवा नांव तरी ऐकिलें असेल. हीं लेणीं याच राष्ट्रकूट राजांच्या वेळेस झालीं असें ह्मणतात. राष्ट्रकूटाच्या मागून पुनः चालुक्य व नंतर यादव ( जाधव ) राजे झाले. रामदेवराव यादवाच्याच वेळेस इ. स. १३१८ त पहिल्यानें मुसलमानांचे पाय या आपल्या महाराष्ट्र देशाला लागले. रामदेवराव कांहीं कमी पराक्रमी नव्हता; पण मुसलमानांच्या कडवेपणापुढें त्याचा टिकाव लागला नाहीं आणि त्याचें राज्य मुसलमानांच्या हातांत गेलें. मोडी लिपी काढणारा आणि हेमांडपंती घरें व देवळें बांधण्याची रीत सुरू करणारा हेमाद्रि ( हेमाडपंत ), व ज्ञानेश्वरी सारखा उत्कृष्ट ग्रंथ लिहिणारे साधु ज्ञानेश्वर, हे याच वेळीं झाले.

दिल्लीच्या मुसलमान बादशहाचा अंमल इकडे सुरू झाल्यावर लवकरच येथें 'ब्राह्मणीराज्य' स्थापन झालें. ब्राह्मणीराज्य ह्मणजे ब्राह्मणांचे राज्य नव्हे. नांव तेवढें ब्राह्मणी, बाकी राज्य होतें मुसलमानांचेंच. हें कसें असें

तुह्मी विचाराल. त्याची हकीकत अशी आहे कीं, पूर्वीं आपल्या इकडे माणसांना विकत घेऊन त्यांना घरीं चाकरीस ठेवण्याची चाल असे. या विकत घेतलेल्या माणसांना गुलाम ह्मणत. असाच एक गुलाम एका ब्राह्मणाचे घरीं होता; पण त्या गुलामाची चांगली वागणूक पाहून त्या दयाळू ब्राह्मणानें त्याला सोडून दिलें होतें. त्यानें इ. स. १३४७ त राज्य स्थापिलें, व आपली सुटका करणाऱ्या ब्राह्मणाचें नांव मागें रहावें ह्मणून आपल्या राज्याला ब्राह्मणी ( बहामनी ) असें नांव दिलें. हें राज्य कांहीं दिवस चांगलें भरभराटलें होतें; पण पुढें इ. स. १५२६ त त्याचीं विजापुरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, वऱ्हाडची इमादशाही आणि बेदरची बुरीदशाही अशीं पांच निरनिराळीं राज्यें झालीं. या ब्राह्मणी राज्यांत हिंदूंचा फार छळ झाला; पण चाकू दगडावर घांसला ह्मणजे त्याच्या वरचा मळ जाऊन तो जसा चकचकीत होतो, तसें मराठ्यांच्या अंगचें मूळचें तेज या छळामुळें हळू हळू बाहेर चमकूं लागलें. इतके दिवस मराठे मुकाट्यानें बसले होते; पण आतां ते हळू हळू आपला पराक्रम दाखवूं लागले.

महाराष्ट्रांत मुसलमानांचें राज्य झालें खरें; पण जेथें तेथें हिंदूंची मदत घेतल्यावांचून दक्षिणेंतल्या मुसलमानांना राज्य करतां येत नव्हतें, यामुळें पुष्कळ मराठ्यांना या वेळीं पुढें सरसावण्याला आयती संधी मिळाली. याच

वेळीं सुदैवानें मुकंदराज, ज्ञानदेव, चांगदेव, नामदेव, चोखामेळा, एकनाथ, तुकाराम, रामदास, वगैरे अनेक साधुसंत निर्माण झाले आणि त्यांच्या उपदेशामुळें सर्व जातींच्या हिंदु लोकांत एकोपा व स्वदेशाभिमान उत्पन्न होऊन मराठ्यांची सत्ता पुनः लवकरच स्थापित होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. विस्तव जसा राखेच्या दडपणाखालीं दबला जावा, तसें मराठ्यांचें तेज आतां पर्यंत परक्या सत्तेच्या दडपणाखालीं दबलें होतें; पण वारा लागून राख दूर होतांच तो विस्तव जसा प्रगट होतो, तसा मराठ्यांचा अभिमान प्रज्वलित होण्याचा व मराठी राज्याची स्थापना होण्याचा काळ आतां अगदीं नजिक येऊन ठेपला होता. ही राज्यस्थापना कोणीं, कोणत्या उपायांनीं व कशी केली त्याविषयींची अत्यंत मनोवेधक कथा पुढच्या गोष्टींत सांगूं.

## गोष्ट २–मालोजी व शहाजी भोसले.

मुसलमानी अमदानींत (राज्यांत) पुष्कळ मराठे सरदार उदयास आले असें मागच्या गोष्टींत सांगितलेंच आहे. फलटणचे निंबाळकर, घाडगे, घोरपडे, मोरे, शिर्के, माने, गुजर, मोहिते, जाधव, भोसले हीं सगळीं मराठ्यांचीं घराणीं या वेळीं प्रसिद्धीस आलीं. पैकीं शेवटचीं

दोन घराणीं विशेष महत्वाचीं आहेत. कारण कीं मराठ्यांची कीर्ति त्रिखंडीं गाजविणारा जो महान् वीर श्रीछत्रपति शिवाजी त्याचा या दोन्ही घराण्यांशीं अगदीं जवळचा संबंध आहे. वर सांगितलेले बहुतेक सगळे मराठे सरदार विजापूरच्या मुसलमान बादशहाच्या पदरीं होते; पण जाधव व भोसले हीं दोन घराणीं अहमदनगरच्या बादशहापाशीं होतीं.

जाधव घराण्यापैकीं लखुजी जाधव हा मागें सांगितलेल्या प्रसिद्ध यादव कुळांतला होता व दरबारांत त्याची प्रतिष्ठाही मोठी होती. मालोजी हा भोसले कुळांतला होता. भोसले हे मूळचे रजपूत क्षत्रिय होते; पण गरीबीमुळें दाक्षिणेंत पाटिलकी वगैरे करून राहत होते. पुढें मालोजी हा लखुजी जाधवरावाचे पदरीं नोकरीस राहिला. दोन्ही घराणीं मूळचीं मोठीं होतीं; पण भोसल्यांचें घराणें गरीब आणि जाधवांचें श्रीमंत असा त्या दोघांच्या स्थितींत त्या वेळीं मोठा फरक होता. जाधवरावाला जिजाबाई नांवाची एक मुलगी होती आणि मालोजीला शहाजी नांवाचा मुलगा होता. मालोजीचें जाधवाचे घरीं जाणें येणें असे व कधीं कधीं तो मुलाला आपले बरोबर तेथें नेत असे. त्याप्रमाणें शिमग्याचे दरबारांत मालोजीनें मुलाला नेलें होतें. इकडे जाधवरावाची मुलगी जिजाबाई ही दरबार पाहण्यास आली होती. जाधवरावांनीं दोघांनाही कौतुकानें मांडीवर घेतलें होतें. इतक्यांत हीं दोन्ही मुलें

परस्परांवर रंग व गुलाल उधळूं लागलीं, तेव्हां जाधवरावांस फार कौतुक वाटलें, आणि 'हा जोडा काय चांगला शोभतो?' असे उद्गार त्यांच्या तोंडून अकल्पित रीतीनें निघाले. मालोजीनें तेवढेंच उचललें आणि 'आजपासून जाधवराव आमचे व्याही झाले' असें सर्वांसमक्ष बोलून दाखविलें. किती झालें तरी मालोजी हा जाधवरावाच्या हाताखालचा माणूस. तेव्हां त्याच्याशीं सोयरीक करण्यांत जाधवरावाला अर्थातच कमीपणा वाटला. इकडे मालोजी पडला पराकाष्ठेचा मानी पुरुष. करीन तर जाधवरावाचीच मुलगी आपल्या मुलाला करीन हा त्याचा निश्चय. तेव्हां अर्थातच दोघांचें वांकडें आलें. आपलें कुळ मोठें असलें तरी आपण गरीब एवढ्याचसाठीं जाधवराव आपल्याशीं सोयरीक करीत नाहीं, ही गोष्ट त्याच्या मनाला अगदीं लागून राहिली आणि अनेक उद्योग करून पैसे मिळविण्याच्या खटपटीस तो लागला. एखादी गोष्ट निश्चयानें हातीं घेतली आणि एकसारखें तिच्याच पाठीस लागलें ह्मणजे बहुतकरून देव तींत यश देतो. मालोजीला त्याच्या खटपटींत देवाच्या कृपेनें चांगलें यश आलें. कोणी ह्मणतात कीं, त्याला जमिनींत पुरलेलें द्रव्य सांपडलें; कोणी ह्मणतात कीं त्यानें खटपट करून मिळविलें. नंतर पुष्कळ दानधर्म करून त्यानें लौकिक मिळविला. तेव्हां बादशहाचीही त्याच्यावर मर्जी बसली आणि त्याच्याच मध्यस्थीनें शहाजी व जिजाबाई यांचें

अखेर लग्न लागून मालोजीचा हेतु पूर्ण झाला. मालोजीला बादशहानें ' राजे ' हा किताब, दोन किल्ले व दोन परगण्यांची जहागीर इतकीं दिलीं होतीं. मालोजीच्या मरणानंतर तीं सगळीं शहाजीकडे आलीं.

शहाजी हाही कांहीं सामान्य पुरुष नव्हता. मालोजीसारख्या जहागिरदाराचा मुलगा आणि जाधवरावासारख्या सरदाराचा जांवई; पण वाडवडिलांकडून मिळालेल्या मोठेपणावरच चैनीनें न राहतां स्वतःची हुषारी व कर्तबगारी दाखवून बढती मिळवावी अशी त्याला मोठी हौस होती. ' बापसे बेटा सवाई ' या ह्मणीप्रमाणें त्यानें खरोखरच मालोजीपेक्षांही दरबारांत अधिक वजन बसविलें. इतकेंच नाहीं, तर आपल्या सासऱ्यावर ह्मणजे जाधवरावावरही सरशी केली. जाधवरावाला हें खपलें नाहीं. शहाजीचा उत्कर्ष त्याला सहन होईना ह्मणून तो मोगलांकडे गेला. दिल्लीचा मोगल बादशहा या वेळीं अहमदनगरची बादशाही बुडविण्याच्या खटपटींत होताच. त्याला या कामीं जाधवरावानें मदत केली. इकडे अहमदनगरच्या बादशाहींत राज्याचें रक्षण करण्यासारखा हुषार माणूस शहाजीखेरीज दुसरा कोणी नव्हता. शहाजीनें बादशाही वांचविण्यासाठीं फार खटपट केली; पण मोगलांचा पक्ष फारच बळवान् होता. त्याच्यापुढें एकट्या शहाजीचें काय चालणार? तरी त्यानें कित्येक महिनेपर्यंत टिकाव धरला हेंच विशेष. अखेर अहमदनगरची निजामशाही बुडाली, तेव्हां शहाजी विजापूर-

च्या बादशहाचे आश्रयास गेला. तेथेंही त्याच्या हुषारी-ची व कर्तबगारीची चांगली छाप पडून दरबारांत त्याची फार वाहवा झाली. जाधवरावानें मात्र मोगलांकडे जाऊन आपल्या धन्याशीं ह्मणजे अहमदनगरच्या बादशहाशीं निमकहरामपणा केला आणि त्याबद्दल त्याला लवकरच प्रायश्चित्त मिळालें. मूर्तजा निजामशहा यानें त्याला पकडून दौलताबादच्या किल्ल्यांत ठेविलें आणि तेथें त्यास व त्याच्या मुलास क्रूरपणानें ठार मारलें.

मालोजीरावाच्या मुलाला आपली मुलगी देण्याचें जाधवरावाच्या मनांत मुळींच नव्हतें; पण बादशहाची मर्जी मोडतां येईना. यासाठीं स्वतःच्या व बायकोच्या इच्छेविरुद्ध जाधवरावानें शहाजीशीं जिजाबाईचें लग्न लावून दिलें होतें. जाधवरावाचें भोसले घराण्याशीं वितुष्ट पडण्याला पहिलें कारण हें होतें; आणि पुढें दरबारांत शहाजीची प्रतिष्ठा जसजशी वाढत गेली, तसतशी जाधवरावाची कमी कमी होत गेली हें दुसरें कारण मिळून जाधवरावाचें शहाजींशीं अगदींच बिनसलें. सासरे आणि जांवईबुवा यांच्या या आपसांतल्या भांडणामुळें बिचाऱ्या जिजाबाईचे मात्र मधल्यामध्यें विनाकारण हाल झाले! कारण इकडे बाप तिला विचारीना आणि तिकडे नवराही नांव घेईना. जिजाबाईला दोन मुलगे झाले. मोठा संभाजी व धाकटा शिवाजी. ज्यानें मराठी राज्याची स्थापना करून मराठ्यांची कीर्ति गाजविली तोच हा शिवाजी होय. याचा

जन्म शिवनेरी किल्ल्यांत इ. स. १६२७ या सालीं झाला.

जिजाबाई नावडती ह्मणून शहाजीनें दुसरें लग्न केलें होतें. या दुसऱ्या बायकोपासून त्याला एक मुलगा झाला. त्याचें नांव व्यंकोजी होतें. शहाजीनें विजापूरच्या बादशहाचे पदरीं असतांना पुष्कळ पराक्रम केले. विशेषतः कर्नाटकांत स्वारी करून तिकडे चांगला दरारा बसविला आणि पुष्कळ मुल्ख मिळविला. तो मुल्ख पुढें व्यंकोजीला मिळाला. शहाजीला कर्नाटकाच्या बंदोबस्तासाठीं तिकडेच रहावें लागे; तथापि जिजाबाई व शिवाजी यांना त्यानें आपल्याजवळ न ठेवितां पुण्याच्या जहागिरीचें ठिकाणीं ठेविलें होतें.

शहाजी यानें कर्नाटकाच्या व्यवस्थेसाठीं महाराष्ट्रांतलीं पुष्कळ विश्वासू व हुपार माणसें आपल्या बरोबर नेलीं होतीं. तीं तिकडेच राहिलीं. त्यांचे वंशज अद्याप तिकडे आहेत. मद्रास, तंजावर वगैरे प्रांतांत मराठी भाषा बोलणारे जे थोडेसे लोक अद्याप आढळतात ते हेच लोक होत. फार दिवस त्या मुलुखांत राहिल्यामुळें त्यांनीं तिकडचा पोषाख व चालीरीती उचलल्या आहेत; पण आपली मराठी भाषा अजून त्यांनीं कायम राखली आहे व त्या भाषेचा आणि मराठ्यांच्या इतिहासाचा त्यांना अद्याप अभिमान वाटतो ही आनंदाची गोष्ट आहे.

असो. याप्रमाणें मराठ्यांची कीर्ति दक्षिणेंत —विशेषतः कर्नाटकांत—पसरविल्यानंतर इ. स. १६६४ त

शहाजी अकस्मात् घोड्यावरून पडून मरण पावला. हा मोठा शूर, धोरणी, अभिमानी आणि धन्याची चाकरी इमानानें करणारा होता.

---

## गोष्ट ३–बालशिवाजी.

——:०:——

शहाजीनें जिजाबाई व शिवाजी या दोघांना पुण्यास ठेविलें होतें. तेथें दादोजी कोंडदेव नांवाचा एक विश्वासू कारभारी जहागिरीच्या बंदोबस्तासाठीं त्यानें ठेविला होता व त्याच्याचकडे शिवाजीला संभाळण्याचें व त्याला शिकविण्याचें काम सोंपविण्यांत आलें होतें. लहानपणापासून शिवाजीला आईचा लळा फार होता आणि तिलाहीं या मुलाशिवाय प्रेमाचें माणूस या जगांत दुसरें कोणी नव्हतें, यामुळें तिचा सारा जीव त्याच्यावर होता. जिजाबाई मोठी धर्मनिष्ठ, मानी, धीराची, धोरणी आणि हुषार होती. तिनें पुष्कळ राजकीय उलाढाल्या पाहिल्या होत्या. ती कधीं भारत–रामायणांतल्या वीरांच्या, आणि कधीं वाडवडिलांच्या शौर्याच्या व वैभवाच्या गोष्टी सांगून शिवाजीच्या मनांत मोठालीं हिमतीचीं कामें करण्याचा हुरूप आणित असे. कोणाच्या तोंडाकडे न पाहतां स्वतःच्या हिमतीवर तिनें बरेच दिवस काढले होते व तेंच वळण तिनें आपल्या मुलालाही लाविलें. चिंचवड, देहू, आळंदी

वगैरे ठिकाणीं देवदर्शनासाठीं व भजनकीर्तनासाठीं जाण्याची शिवाजीला मोठी आवड असे. जिजाबाईची परमेश्वराचे ठायीं अत्यंत निष्ठा असे, आणि कोणतेंही साहसाचें काम परमेश्वरावर हवाला टाकून करीत रहावें अशी शिवाजीला तिची नेहमीं शिकवणी असे. आपल्या मुलानें एखादें मोठें धाडसाचें काम तडीस नेल्यावर तिला जी धन्यता वाटे आणि त्याला ती जी शाबासकी देई, तिच्या योगानें तशीं आणखी कामें करण्यास त्याला स्फुरण चढत असे. सारांश, त्या समयाला आणि स्थितीला ज्या प्रकारचें शिक्षण अगदीं योग्य होतें, तसेंच शिक्षण जिजाबाईकडून शिवाजीला मिळत होतें.

हें जसें घरांत जिजाबाईकडून शिक्षण मिळत होतें, तसें बाहेर दादोजी कोंडदेवाकडूनही त्याला चांगलें शिक्षण मिळत गेलें. दादोजीला अन्यायाची मोठी चीड होती. त्याच्या स्वभावांत करारीपणा व निश्चय हे दोन गुण विशेष होते. असें सांगतात कीं, एकदां त्याच्या हातून चुकून अन्यायाचें कांहीं कृत्य घडलें. त्यावरून त्या हातास शिक्षा लावण्यासाठीं त्या हाताची बाही त्यानें जन्मभर आंखूड ठेविली होती. जिजाबाई आणि दादोजी यांच्यासारख्या करारी माणसांच्या सतत सहवासांत राहिल्यावर त्यांचे ते गुण शिवाजीच्या अंगीं पूर्णपणें उतरले यांत काय आश्चर्य! दादोजीनें शिवाजीला दांडपट्टा खेळणें, घोड्यावर बसणें, पोहणें, निशाण मारणें वगैरे कामांत

तरबेज केलें होतें. तसेंच जहागिरीची व्यवस्था कशी करावी, रयतेस आबाद ठेवून उत्पन्न कसें वाढवावें, नवीन जमीन लागवडीस कशी आणावी, शेतीची सुधारणा कशी करावी, इत्यादि सगळ्या गोष्टी दादोजीनें शिवाजीस शिकविल्या. हें व्यावहारिक शिक्षण शिवाजीला पुढें फार उपयोगीं पडलें.

दादोजी कोंडदेव वर्तनानें अगदीं निर्मळ आणि व्यवहारांत अतिशय दक्ष असल्यामुळें त्याला सगळे वचकत असत. मावळ प्रांतांत शहाजीची जहागिर होतीच. त्यामुळें तेथें राहणारे पुष्कळ लोक ( मावळे ) दादोजीकडे येत जात. त्यांची ओळख शिवाजीनें प्रथम करून घेतली. हे लोक बावळे आणि अडाणी दिसत; पण अतिशय प्रामाणिक, मेहनती, काटक, शूर, चपळ, आणि धन्याचें काम इमानानें करणारे होते. त्यांना मायाळूपणानें वागवून शिवाजीनें आपलेंसें करून घेतलें आणि त्यांच्या मदतीनें हळू हळू मावळ प्रांतांतल्या दऱ्या, खोरीं, चोरवाटा वगैरेंची उत्तम माहिती करून घेतली. मग मावळ्यांना अन्नवस्त्र देऊन त्यांची एक लहानशी फौज त्यानें तयार केली. मुसलमानांकडून आपल्या देशबांधवांचा होत असलेला छळ पाहून शिवाजीच्या मनांत लहानपणापासून मुसलमानांविषयींचा द्वेष पक्का बाणला होता, आणि त्यांच्या हातून मराठ्यांचा जो अपमान होई तो कसा दूर करावा या विचारांत तो नेहमीं असे. मुसलमान बादशहाविरुद्ध

बंडावा करावा, त्याचे किल्ले घ्यावे, प्रांत घ्यावे आणि हिंदूंचें राज्य करावें अशी त्याची इच्छा होती. ही इच्छा कांहीं वावगी नव्हती, आणि दादोजीलाही ती वावगी वाटली नाहीं; मात्र असें करण्यापासून वडिलांनीं मिळवून ठेवली आहे ती दौलत व जहागिर वाढविण्याचें एकीकडेच राहून उलट आहे तीही गमाविली असा दुर्लौकिक मात्र करून घेऊं नये असा त्याचा शिवाजीला नेहमीं उपदेश असे. दादोजीच्या वयाकडे, अनुभवाकडे, प्रामाणिकपणाकडें, इमानाकडे आणि मायाळू स्वभावाकडे पाहून शिवाजी त्याला अतिशय मान देत असे.

सारांश, शिवाजीनें लहानपणीं जीं करावयाचीं तीं सगळीं कामें योग्य प्रकारें केलीं. त्या काळाला योग्य अशी विद्या त्यानें संपादन केली; रामायण, भारत, भागवत वगैरे धर्मग्रंथांतल्या कथा ऐकून त्या नीट लक्षांत ठेविल्या; जहागिरीच्या बंदोबस्ताचें काम लक्षपूर्वक शिकून घेतलें; आणि आईच्या जिवाला समाधान होईल अशी वागणूक ठेवली. लहानपणीं संपादन केलेल्या या विद्येचा व गुणांचा मोठेपणीं त्याला फायदा मिळाला. तो कसा तें पुढील गोष्टींवरून कळेल.

---

## गोष्ट ४ थी—वीर शिवाजी.

शिवाजीचें बालपण सरतें न सरतें तोंच तो मोठमोठ्या

राजकीय उलाढाल्या करूं लागला. मुसलमानांचें राज्य हळू हळू नाहींसें करून आपलें हिंदूंचें राज्य स्थापायाचें हा आपला बेत त्यानें आपल्या कांहीं जिवलग मित्रांस कळविला होता आणि त्यांच्या मदतीनें तो त्या उद्योगास लागला होता. या मित्रमंडळींत दादोजीच्या कचेरींतले पांच चार ब्राह्मण कारकून आणि येसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजी फसलकर वगैरे मावळे मंडळी होती. या मंडळीनें यत्किंचित्‌ही बोभाटा न करतां मुकाट्यानें फौजेची तयारी चालविली व लवकरच तोरणा किल्ल्याच्या किल्लेदाराशीं युक्तीनें संधान बांधून शिवाजीनें तो किल्ला घेतला. ही गोष्ट इ. स. १६४६ त घडली. या वेळीं शिवाजीचें वय अववें १९ वर्षांचें होतें. ज्या वयांत त्याच्यासारख्या तरुणानें खावें प्यावें, हूडपणा करावा आणि वडिलांच्या जिवावर मौजा माराव्या, त्याच वयांत शिवाजी फौज जमविण्याच्या, किल्ले घेण्याच्या आणि राज्य मिळविण्याच्या भानगडींत पडला व देवानें त्याला त्या खटपटींत चांगलें यशही दिलें. शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला; पण सगळा बादशाही कारभार! हातचा किल्ला गेला ही गोष्ट बादशहाच्या कानांपर्यंत जाऊन पोंचावयास कित्येक महिने लागले! तोंपर्यंत इकडे शिवाजीनें त्या किल्ल्याची डागडुजी करून व आणखी मावळे लोक जमवून चांगला बंदोबस्त केला.

डागडुजी चालली असतां त्या किल्ल्यांतच शिवाजीला द्रव्याचे हंडे सांपडले. त्याचें आयतें काम झालें! त्यानें त्या पैशानें जवळच राजगड नांवाचा एक नवा किल्ला बांधला. या गोष्टीची खबर विजापूरच्या दरबारीं कळली, तेव्हां बादशहानें 'तुमच्या मुलानें हा काय प्रकार चालविला आहे?' असें शहाजीस पत्रद्वारें विचारलें. शहाजीला यांतलें काहींच ठाऊक नव्हतें. तो काय उत्तर देणार? त्यानें दादोजीला खरमरीत पत्र पाठवून मुलाला धाकांत ठेवण्यास सांगितलें. दादोजीनें वडिलाच्या नात्यानें शिवाजीला जो उपदेश करावयाचा तो केला व शिवाजीनेंही तो मुकाट्यानें ऐकून घेतला. पुढें लवकरच दादोजी कोंडदेव मरण पावला.

एक किल्ला घेतलेला पचला असें पाहून शिवाजी हळू हळू पाय पसरीत चालला. त्याच्याजवळ फार थोडी फौज होती. उघड लढाई केली असतां टिकाव लागेल असा भरंवसा नव्हता. ह्मणून शक्तीचा उपयोग नसेल तेथें युक्ति लढवून त्यानें चाकण, कोंडाणें, पुरंदर, वगैरे किल्ल्यांवरील लोकांना आपलेसे करून घेऊन ते किल्ले मिळाविले. कल्याणच्या सुभेदाराकडून विजापुरास बादशहाकडे खजिना जात होता त्यावर एकदम हल्ला करून शिवाजीनें तो राजगडावर नेला व नंतर दुसरेही कित्येक किल्ले हस्तगत केले.

## गोष्ट ५ वी-चंद्रराव मोरे.

याप्रमाणें शिवाजीनें एकामागून एक किल्ले व मुलूख घेण्याचा सपाटा लाविला, तेव्हां आतां स्वस्थ बसून उपयोग नाहीं, या पोराला शिक्षा केलीच पाहिजे, असा विचार करून विजापुरच्या बादशहानें बाजी श्यामराज नांवाच्या एका सरदारास शिवाजीस पकडून आणण्यासाठीं पाठविलें. त्या वेळीं शिवाजी महाडास होता व तेथून जवळच जावळी येथें चंद्रराव मोरे नांवाच्या मराठे सरदाराचें राज्य होतें. या मोऱ्याची बाजी श्यामराज यास मदत होती. चंद्ररावास हरयुक्तीनें अनुकूल करून घ्यावें असें शिवाजीनें प्रथम मनांत आणिलें; पण तो सामोपचारानें वळणारा नव्हता. बरें, उघड रीतीनें त्याच्याशीं लढाई करावी तर तितकी फौज शिवाजीजवळ नव्हती. तेव्हां काय करावें हा त्याला मोठा विचार येऊन पडला. पण त्याच्याजवळ पुष्कळ युक्त्या भरल्या होत्या. मोऱ्याच्या मुलीस मागणी घालण्याच्या मिषानें त्यानें राघो बल्लाळ व संभाजी कावजी या दोघां सरदारांस पाठविलें आणि वेळेस उपयोगीं पडावी ह्मणून थोडीशी फौजही त्यांच्या जवळ तयार ठेविली. राघो बल्लाळ यानें मसलतीसाठीं चंद्रराव व त्याचा भाऊ सूर्यराव यांस एके बाजूस नेऊन दोघांसही ठार मारलें, व जावळी मुलुख घेतला. नंतर लवकरच प्रतापगड येथें शिवाजीनें श्रीभवानी देवीची स्थापना

केली. (चित्र पहा.)हा सगळा प्रकार पाहिल्यावर आपली येथें धडगत नाहीं असें वाटून वाजी श्यामराज मुकाट्यानें चालता झाला, आणि मुसलमानांस अनुकूळ असलेल्या इतर मराठे सरदारांनाही त्यामुळें शिवाजीचा दरारा वाटूं लागला.

---

## गोष्ट ६ वी–विजापुरचा वाघ आणि प्रतापगड-च्या डोंगरांतला उंदीर.

—————:*:—————

विजापुरच्या बादशहास ही हकीकत कळली तेव्हां तो अतिशय संतापला, आणि शिवाजीची खोड मोडण्यासाठीं चांगल्या कडक उपायांची योजना केली पाहिजे असा विचार करून त्यानें अफजुलखान नांवाच्या सरदारास शिवाजीवर पाठविलें. हा अफजुलखान फार मोठा सरदार होता. त्याचा दरारा भारी असे. ह्मणून त्याला 'विजापुरचा वाघ' ह्मणत असत. 'शिवाजी ह्मणजे काय यःकश्चित् डोंगरांतला उंदीर! त्याचीं विशाद काय? त्याला जिवंत किंवा मेलेला कसा तरी खात्रीनें धरून आणतों' अशी प्रतिज्ञा करून व बरोबर बारा हजार फौज घेऊन अफजुलखान निघाला होता. शिवाजी त्या वेळीं प्रतापगडाकडे होता. तिकडे खान गेला. त्यानें जातां जातां पंढरपुरचा विठोबा व तुळजापुरची भवानी हीं देवस्थानें भ्रष्ट केलीं, यामुळें मराठे लोकांस अर्थातच चीड आली; पण

करतात काय? खान कांहीं सामान्य सरदार नव्हता. शिवाजीवर आतां मोठा कठिण प्रसंग येऊन बेतला होता, आणि यांतून आपण कसे निभावतों याबद्दल त्याची त्यालाच मोठी काळजी वाटत होती. पण येथेंही शक्ती-पेक्षां युक्तिच अधिक कामास आली. खानानें शिवाजीकडे कृष्णाजी भास्कर नांवाचा एक ब्राह्मण वकील पाठविला होता. शिवाजीनें धर्माभिमानाच्या व देशाभिमानाच्या गोष्टी सांगून त्याला आपणांस अनुकूळ करून घेतलें व त्याच्याकडून खानाचा खरा बेत काय आहे तो काढून घेत-ला. नंतर शिवाजीनें आपला वकील दत्ताजी गोपीनाथ याला खानाकडे पाठवून आपल्यासारख्या बलाढ्य सरदाराशीं सा-मना करण्याची माझी ताकद नाहीं झालेल्या अपराधांची क्षमा करून खानसाहेब मला जीवदान देतील तर मी त्यांस शरण जाण्यास तयार आहे. असा अगदीं नम्रप-णाचा निरोप कळविला. तो निरोप ऐकून खानसा-हेब अगदीं खुष झाले आणि प्रतापगडाखालीं नु-सत्या एका हत्यारबंद शिपायासह शिवाजीच्या भेटीस येण्यास ते कबूल झाले.

## शेवटीं उंदरानें वाघास खाल्लें.

---

भेटीचा दिवस ठरला. प्रतापगडच्या किल्ल्याखालीं ठर-



प्रतापगडची श्रीभवानी.

लेल्या ठिकाणीं शिवाजीनें एक उत्तम मंडप तयार करविला. त्यानें चोहोंकडे चौक्या बसवून सर्व वाटा अगोदरच बंद करून टाकिल्या होत्या. जाण्यायेण्यासाठीं फक्त एक वाट मोकळी ठेविली होती. मंडपाचे मागचे बाजूस एक मोठा चर खणून त्यांत चाळीस हुषार व विश्वासाचीं माणसें अगोदर बसवून ठेविलीं होतीं. शिवाजीनें अंगांत चिलखखत, त्यावर अंगरखा, डोकीस शिरस्त्राण व वर पागोटें, उजव्या हातांत भवानी तलवार व बाहींत बिचवा, डाव्या हातांत वाघनखें याप्रमाणें स्वतःच्या बचावाची सगळी तयारी करून देवदर्शन घेतलें, आईच्या पायांवर डोकें ठेविलें आणि 'विजयी हो' असा आशीर्वाद घेतला. प्रसंग कठिण होता; ह्मणून न जाणो तो प्रतिकूळ झालाच, तर आपल्यामागें राज्याची व्यवस्था काय करावयाची ती सांगून शिवाजीनें सर्व निरवानिरव केली. गडावरच्या लोकांना सावध राहण्याविषयीं इषारा केला आणि मंडपांत स्वारी दाखल झाली. लवकरच खानाचीही स्वारी आल्याचें कळलें ह्मणून शिवाजी त्याला सामोरा गेला. या वेळीं खानाबरोबर एक हत्यारबंद पठाण व वकील कृष्णाजी भास्कर हे दोघे होते. शिवाजीनें तानाजीस बरोबर घेतलें होतें. भेट होतांच 'तुह्मी बादशहाचे गुन्हेगार आहां; बादशहानें तुह्मांस बोलाविलें आहे; आमच्या बरोबर चलावें' असें खानानें शिवाजीस ह्मटलें. शिवाजीनें नम्रपणानें उत्तर केलें, 'खानसाहेब, बादशहाचे पदरचे सरदार. त्यांनीं अन्याय पोटांत घालावा.' असें ह्म-

णून शिवाजी खानास भेटला. खान फार बळकट होता. त्यानें विश्वासघात करून शिवाजीस बगलेंत आंवळून धरलें आणि कट्यार चालविली; पण शिवाजीच्या अंगांत चिलखत असल्यामुळें वार लागला नाहीं. शिवाजीनें लागलीच चपळाई करून खानाच्या पोटांत वाघनखें खुपसलीं व पोट फोडून कोथळा बाहेर काढला! 'दगा रे दगा' असें खान ओरडला, तेव्हां खानाच्या बरोबरचा पठाण शिवाजीचे अंगावर धांवला; पण तानाजीनें त्याला ठार केलें. खान ठार झालाच होता. इतक्यांत पालखीचे भोई जलदी करून खानाचा मुर्दा पालखींत घालून नेऊं लागले, पण शिवाजीचे लोकांनीं त्यांना मारून खानाचें शिर कापून आणिलें. ही गडबड ऐकून घरांत लपलेले लोक बाहेर आले. त्यांना घेऊन शिवाजी गडावर गेला. खानाचें शिर आणिलें होतें तें दरवाजावर बांधलें व किल्ल्याचे बुरुजावरून तोफा सोडल्या. त्या ऐकतांच मावळ्यांची फौज जमा झाली आणि खानाच्या फौजेवर तुटून पडली. मुसलमान पेंचांत सांपडले. कित्येक मारले गेले व कित्येक पळून गेले. मराठ्यांनीं या वेळीं जंगीं लूट मिळविली व पुष्कळ किल्ले घेतले. खानानें तुळजापुरच्या भवानीचें देवस्थान भ्रष्ट करून मराठ्यांना चीड आणिली आणि विनहत्यारी भेटीस येतों असें अगोदर कबूल करून शिवाजी राजावर कट्यार चालवून विश्वासघात केला, या दोन गोष्टींबद्दल त्याला

घडलेलें शासन अगदीं योग्य होतें. याच अफजुलखानानें पूर्वीं शिवाजीचा वडील भाऊ संभाजी याला मारलें होतें. तेव्हां त्याला मारून शिवाजीनें आपल्या भावाच्या मरणाचा सूड उगवल्यासारखें झालें हें पाहून जिजाबाईला फार धन्यता वाटली यांत नवल नाहीं.

## गोष्ट ७ वी—बाजी प्रभूचा पराक्रम.

अफजुलखानाच्या मरणानें मराठ्यांना जितका आनंद तितकाच मुसलमानांना शोक झाला. शिवाजीनें केलेल्या एकेक अचाट कृत्याचें वर्तमान ऐकून विजापुरच्या बादशहाची तर अगदीं पांचावर धारण बसली. त्यानें शिद्दी जोहर याला शिवाजीच्या बंदोबस्तासाठीं मोठी फौज देऊन पाठविलें. अफजुलखानाचा मुलगा फाजलखान हाही त्याचेबरोबर होता. जंजिऱ्याचे शिद्दी व वाडीचे सावंत हेही याचवेळीं शिवाजीवर उठले. अशा वेळीं एखादा लेचापेचा माणूस असता तर तो अगदीं घाबरून गेला असता; पण शिवाजी पक्का धीराचा होता. त्यानें एका भरंवशाचे सरदाराला जंजिऱ्याचे शिद्दीवर व एकाला सावंताचा बंदोबस्त करण्यास पाठविलें व आपण पन्हाळा किल्ल्यावर राहिला. जोहारानें त्या किल्ल्याला वेढा दिला. शिवाजीस अगोदर वाटला

होता तितका तो किल्ला मजबूत नव्हता. तेव्हां युक्तीनें तेथून निघून जाणें त्याला अवश्य होतें. शिवाजीजवळ पुष्कळ युक्त्या भरल्या होत्या. त्यानें जोहाराशीं तहाचें बोलणें लाविलें आणि रात्रीं मुसलमान लोक बेसावध असतां तो उघडपणें त्यांच्या फौजेंतून रस्ता काढीत निवडक मावळे मंडळीला घेऊन विशाळगड किल्ल्याकडे चालता झाला. मुसलमानांजवळ फौज मोठी होती. त्या फौजेनें पाठलाग केला आणि ती खिंडीजवळ त्याला गांठणार, इतक्यांत बाजी देशपांडे नांवाचा एक अत्यंत विश्वासू आणि शूर प्रभु जातीचा सरदार शिवाजीनें खिंडीचे तोंडापाशीं ठेविला होता, त्यानें त्या फौजेला अडविलें आणि मोठ्या निकरानें लढून मुसलमानांना मागें खिंडींतून हटविलें. बाजी प्रभु लढतांना जखमी झाला होता, तरी तो तसाच लढत राहिला. शिवाजी गडावर सुखरूप पोंचल्याबद्दलच्या तोफांचे आवाज त्यानें ऐकले, तेव्हां त्याचा जीव खालीं पडला व 'मीं आपली कामगिरी बजाविली; धन्याच्या उपयोगीं पडलों; आतां मी सुखानें मरेन' असे समाधानाचे उद्गार काढून त्यानें प्राण सोडला. बाजीसारखा इमानी आणि पराक्रमी सरदार गेल्याबद्दल शिवाजीला अत्यंत दुःख झालें. लढाईत जखम लागून अगदीं मरणोन्मुख झाला असतांही ज्यानें हातची तलवार खालीं ठेवली नाही व आपली कामगिरी बजाविण्यांतच ज्यानें समाधान मानलें त्या माणसाची योग्यता केवढी थोर

ह्मटली पाहिजे! थोड्या लोकांनिशीं शत्रूच्या मोठ्या फौजेला तोंड देऊन तिला अडवून धरणें आणि तसें करतां करतां रणभूमीवर देह ठेवणें या गोष्टीनें बाजी प्रभूची कीर्ति इतिहासांत कायमची राहील.

यापमाणें शिवाजीनें हरएक प्रसंगीं जय मिळवून आणि एकामागून मुलूख व किल्ले घेऊन विजापुरच्या बादशहास अगदीं जेरीस आणिलें, तेव्हां त्यानें शहाजीस मध्यस्थीस घालून त्याच्या मार्फत शिवाजीशीं तह केला.

## गोष्ट ८ वी–फिरंगोजीची स्वामिभक्ति.

विजापूरच्या बादशहाशीं तह केल्यामुळें त्याच्या मुलुखांत शिवाजीला गडबड करतां येईना आणि स्वस्थ बसणें तर त्याला आवडत नव्हतें; तेव्हां त्यानें मोंगल बादशहाच्या मुलुखांत गडबडीस प्रारंभ केला. शिवाजीनें प्रथम जुन्नर शहर लुटलें; व कित्येक किल्ले घेतले आणि खंडणी घेत घेत त्याचें सैन्य औरंगाबादेपर्यंत जाऊन पोंचलें. हें वर्तमान दिल्लीच्या बादशहा औरंगजेब याला कळलें तेव्हां तो फार चिडला. ज्याच्याकडे वर मान करून बघण्याची मोठमोठ्या मी मी ह्मणविणाऱ्या सरदारांची छाती नव्हती, अशा महान् बलाढ्य मोंगल बादशहाचा मुलूख दक्षिणेंतल्या यःकश्चित् जहागिरदाराच्या मुलानें बलात्कारानें घ्यावा याचा अर्थ काय? असें वाटून औ-

रंगजेब बादशहा मनस्वी चिडला, आणि शिवाजीस चिरडून टाकण्यासाठीं त्यानें शाहिस्तेखान नांवाच्या एका बड्या सरदारास पाठविलें. खान चाकणच्या किल्ल्यास वेढा देऊन दोन महिनेपर्यंत बसला; पण तेथील कामगार फिरंगोजी नरसाळा यानें त्यास दाद दिली नाहीं. अखेर खानानें सुरुंग लावून आंत जाण्यास एक लहानसें भोंक पाडलें. फिरंगोजी व त्याचे लोक इतक्या आवेशानें लढले कीं, खान त्यांच्या शौर्याची तारीफ करीत राहिला. पण अखेर त्यांचा निरुपाय होऊन किल्ला मोगलांच्या हातांत गेला. फिरंगोजीही त्यांच्या हातांत सांपडला. खानानें त्याला मोठ्या सन्मानानें वागविलें आणि पुष्कळ प्रकारची लालूच दाखवून बादशहाच्या नोकरींत येण्याविषयीं आग्रह केला. आपण 'नाहीं' ह्मटलें तर हा कदाचित् आपला प्राण सुद्धां घेईल, हें पक्कें ठाऊक असूनही फिरंगोजीनें मोगलांच्या नौकरीविषयीं आपला अत्यंत तिरस्कार दाखविला; तरी खानास राग न येतां उलट त्याच्या धैर्याचें आणि स्वामिभक्तीचें त्याला मोठें कौतुक वाटलें व त्यानें मोठ्या आदरसत्कारानें बरोबर मोठा इतमाम देऊन त्याला शिवाजीकडे पाठविलें. फिरंगोजीसारखीं अनेक माणसें त्या काळीं मराठ्यांत होतीं ह्मणूनच शिवाजीला मराठी राज्य स्थापन करतां आलें.

## गोष्ट ९ वी–" ये आदमी नही, बडा सैतान है."

शाहिस्तेखान पुण्यास आला, तो मोठ्या ऐटीनें शिवाजीच्याच वाड्यांत येऊन उतरला. शिवाजी त्या वेळीं राजगडास होता. त्यानें पुण्याच्या आसपास ठिकठिकाणीं आपली फौज ठेवून कांहीं निवडक लोकांनिशीं एका लग्नाच्या वरातीबरोबर रात्रीं शहरांत प्रवेश केला, आणि चौकीवरल्या लोकांस कळूं न देतां युक्तीनें शाहिस्तेखान निजला होता त्या जागीं अचानक शिरला. त्याला पाहून जनानखान्यांतल्या बायका घाबरल्या व त्यांनीं खानास जागें केलें. शाहिस्तेखान घाबरून बायकांत शिरला आणि बायकांनीं दिवे विझवून टाकिले. शाहिस्तेखानानें जीव बचावण्यासाठीं खिडकींतून बाहेर उडी टाकिली. तरी अंधारांत शिवाजीनें खानावर वार करून त्याच्या हाताचीं बोटें छाटिलीं. ही गडबड ऐकून खानाचे लोक जागे झाले. तेव्हां शिवाजी तेथून निसटून आपल्या फौजेंत येऊन मिळाला. बैलांच्या शिंगांस पेटलेले पोत बांधून त्यांना कात्रजकडे सोडून देण्याची तजवीज त्यानें अगोदरच करून ठेवली होती. ते पोत पाहून शिवाजी तिकडे जात आहे असें खानास वाटलें व तो तिकडे त्याचा पाठलाग करीत गेला, पण फसला. शिवाजीचें धाडस व युक्त्या पाहून त्याच्या पुढें आपला टिकाव लागणार नाहीं, आणि आपल्या प्राणावर केव्हां येऊन बेतेल याचा नेम नाहीं, असा वि-

चार करून खान खिन्न मुद्रेनें दिल्लीस परत गेला. हें सर्व वर्तमान औरंगजेब बादशहास कळलें, तेव्हां शिवाजीचें धाडस पाहून 'ये आदमी नहीं, बडा सैतान है!' असे भयाचे उद्गार त्याच्या तोंडून निघाले.

यानंतर लवकरच शहाजीराजे मरण पावले. त्यांची हकीकत मागें एका गोष्टींत सांगितलीच आहे. शहाजीच्या मागें त्याचा 'राजा' हा किताब शिवाजी यानें आपल्या नांवाला जोडला. शिवाजीनें स्वतःच्या पराक्रमानें राज्य मिळविलें होतें, आणि त्यानें मनांत आणिलें असतें तर यापूर्वी सुद्धां त्याला स्वतःला 'राजा' ह्मणवून घेतां आलें असतें; पण वडिलांचा मान राखण्यासाठीं त्यानें मुद्दाम तसें केलें नाहीं. यावरून शिवाजी वडिलांस किती मान देत असे तें दिसून येतें. शहाजी वारल्यानंतर आपला वीर शिवा 'राजा शिवाजी' झाला. (चित्र पहा) ही गोष्ट इ. स. १६६४ त घडली.

## गोष्ट १० वी—राजा शिवाजी.

शिवाजी राजा झाला, तेव्हां आतां त्याला खूप चैन करावयास सांपडली असावी अशी तुमची समजूत कदाचित् झाली असेल; पण ती अगदीं चुकीची आहे. त्यानें आजपर्यंत कष्ट सोसून पुष्कळ द्रव्य मिळविलें, मुलूख जिंकले व मोठालीं धाडसाचीं कामें करून मी मी ह्मण-



जन्म. इ. स. १६२७. श्री शिवाजी महाराज मृत्यू १६८०

ऱ्या मुसल्मान सरदारांना चीत केलें. पण यामुळें काय रिणाम घडला ? तर मुसलमान लोक त्याच्यावर अतिय चिडले. औरंगजेब बादशहा तर त्याला पाण्यांत हूं लागला. नवीन मुलूख कसे जिंकतां येतील, जिंकलेले से राखतां येतील, आणि स्वतःच्या प्रजेचें रक्षण कसें रतां येईल या तीन गोष्टींची काळजी शिवाजीला नेहमीं गवावी लागे, आणि ज्याला अशी काळजी सतत वाहावी गते, त्याला चैन कोठून सुचणार ? आणि सुख कोठून ळणार ? आणि हे सगळे कष्ट शिवाजी स्वतःसाठीं करीत व्हता; तर हिंदु लोकांना मुसलमानांकडून जो छळ सोवा लागे तो नाहींसा व्हावा, आणि मराठ्यांचें राज्य तः दाक्षिणेंत चोहोंकडे व्हावें येवढ्यासाठीं करीत होता. पल्या लोकांचा नांवलौकिक वाढावा, आणि देशाचें ल्याण व्हावें ह्मणून स्वतःच्या जिवाकडे सुद्धां न पाहतां झटतो तो खरा देशभक्त आणि खरा देशाभिमानी ष्य होय. या दृष्टीनें पाहतां शिवाजी किती थोर देशामानी होता, तें तुमच्या लक्षांत येईल.

शिवाजी जसा देशाच्या हिताचे कामीं स्वतःच्या जिवाडे न पाहणारा होता, तशीं धन्याच्या जिवासाठीं आप जीव देणारीं शेंकडों इमानी माणसेंही त्याला मिळालीं तीं. मुरारबाजी हा त्यांपैकीं एक होता. याची गोष्ट ऐऱ्यासारखी आहे.

---

## गोष्ट ११ वी-मुरार बाजीचा पराक्रम.

शिवाजीनें शाहिस्तेखानाची मागील गोष्टींत सांगितल्या-प्रमाणें अवस्था केली, सुरत शहर लुटलें, आणि मक्केस जाणाऱ्या मुसलमान यात्रेकरूंच्या गलबतांवर हल्ला करून लूट-मारली. हें पाहून औरंगजेब बादशहाला शिवाजीचा पक्का बंदोबस्त करण्याविषयींची विशेष काळजी वाटूं लागली, आणि त्यानें जयसिंग आणि दिलेलखान या दोघां सरदारांस शिवाजीवर पाठविलें. दिलेलखानानें पुरंदर किल्ल्याला व जयसिंगानें कोंडाणा किल्ल्याला वेढा घालून कांहीं फौज राज-गडाकडेही पाठविली. शिवाजी या वेळीं दक्षिणेंत गेला होता, व दोन्ही किल्ल्यांत फार थोडे लोक होते. पुरंदर किल्ल्याचे वरचा कोट आणि खालचा कोट असे दोन भाग होते. पैकीं खालचा कोट मोगलांनीं शिकस्त करून घेतला. हें पाहून त्या किल्ल्यावरील अधिकारी मुरार बाजी हा अतिशय निकरानें लढला. त्यानें मोगलांस किल्ल्यांतून हाकलून लाविलें आणि दिलेलखानाच्या तंबूपर्यंत त्यांचा पाठलाग केला. हें पाहून खान आपली सगळी फौज गोळा करून मुरार बाजीवर चालून गेला. दोघांची निकराची लढाई झाली. तींत पुष्कळ मराठे मारले गेले व जखमी झाले. बाजीची ढाल तुटली, तेव्हां हातास शेला गुंडाळून त्यावर तो शत्रूचे घाव झेलून घेऊं लागला. अशा रीतीनें लढतां लढतां शूर बाजी मरण पावला. असें सांगतात कीं, बा-

जीचें शीर तुटल्यावर त्याच्या नुसत्या धडानें तीनशें मुसलमानांना ठार केलें! मराठ्यांनीं शेवटीं हा किल्ला मुसलमानांचे हातीं जाऊं दिला नाहीं तो नाहींच!!

मोगल आल्याची खबर शिवाजीला दक्षिणेंत लागतांच तो लवकर धांवून आला; पण जयसिंग व दिलेलखान यांची जंगी फौज व कडेकोट बंदोबस्त पाहून त्यांच्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं असें त्याला दिसलें. तेव्हां त्यानें जयसिंगाशीं स्नेह करून त्याच्या मनांत हिंदुधर्माविषयींचा अभिमान जागृत केला आणि त्याच्यामार्फत दोघांही पक्षांना फायद्याचा असा तह ठरवून घेतला. या तहानें शिवाजीला कांहीं हक्क मिळाले; पण त्याबद्दल मोगलांस कित्येक किल्ले देणें, विजापूर जिंकण्याचे कामीं त्यांस मदत करणें आणि दिल्लीस बादशहाचे भेटीस जाणें या तीन गोष्टी त्याला कबूल कराव्या लागल्या. त्या कबूल करून शिवाजीनें आलेलें संकट एकदांचें टाळलें. कबूल केल्याप्रमाणें विजापुरावर केलेल्या मोहिमेंत त्यानें मोगलांस मदत केली आणि नंतर बादशहाचें बोलावणें आल्यावरून दिल्लीस जाण्याची तयारी केली. दिल्लीस जाण्यांत जिवाला धोका आहे हें त्याला ठाऊक होतें; पण जयसिंगानें त्याच्या जिवाची हमी घेतली आणि आपला मुलगा रामसिंग ( हा या वेळीं दिल्लीस बादशहाजवळ होता ) यास त्याच्या बचावासाठीं खबरदारी घेण्याविषयीं लिहिलें; तेव्हां आपल्यामागें राज्याचा कसा काय बंदोबस्त ठेवाव-

याचा त्याची सगळी तजवीज करून आणि बरोबर वडील मुलगा संभाजी व जिवास जीव देणारीं तानाजीसारखीं कांहीं निवडक माणसें घेऊन शिवाजी दिल्लीस गेला.

## गोष्ट १२ वी–बादशहाची दगलबाजी आणि शिवाजीची धूर्तता.

दिल्लीस पोंचल्यावर ठरल्या दिवशीं शिवाजी आपला मुलगा संभाजी याला घेऊन बादशहाच्या भेटीस गेला. शिवाजीचा भर दरबारांत अपमान करून त्याला दगलबाजीनें कैद करून ठेवावयाचें असा बादशहाचा अगोदरच निश्चय झाला होता असें वाटतें. कारण दरबारांत आल्यावर त्यानें शिवाजीला जसवंतसिंगाच्या खालीं उभें राहण्यास सांगितलें. शिवाजीला हा अपमान कोठून सहन होणार? तो रागानें लाल झाला; आणि लागलेच आवेशासरसे मराठी भाषेंत कांहीं रागाचे शब्द त्याच्या तोंडून निघाले. बादशहास त्या शब्दांचा अर्थ कळला नाहीं, पण कांहीं तरी कमजास्त प्रकार आहे येवढें कळलें, व त्यानें घाबरून शिवाजीला डेऱ्यास घेऊन जाण्याविषयीं रामसिंगास सांगितलें.

शिवाजी मोठा बळवान् व युक्तिवान् आहे, तो केव्हां

दगा करील याचा नेम नाहीं, अशी धास्ती वाटून बादशहानें शहरच्या मुख्य कोतवालाबरोबर पांच हजार फौज दिली आणि फार सावधगिरीनें त्याच्यावर पाहरा करण्याविषयीं त्याला बजावलें. कोतवालानें शिवाजीच्या डेऱ्याला गराडा घालून सक्त पहारा ठेविला. शिवाजी अवरंगजेबाच्या कैदेंत पडला, तरी तो डगमगला नाहीं. त्याच्याबरोबर कांहीं निवडक विश्वासू माणसें होतींच. त्यांची सल्ला घेऊन तेथून निसटण्याची त्यानें एक युक्ति शोधून काढली. प्रथम बादशहाच्या परवानगीनें त्यानें आपली सगळी फौज देशीं परत पाठविली; आणि मग हळू हळू जवळच्या पहारेकऱ्यांशीं संधान बांधून दिल्लींतील मोठमोठ्या अमीरउमरावांकडे मोठाल्या पेटाऱ्यांतून रोज मेवामिठाई नजर पाठविण्याचा पाठ ठेविला. पहिल्या पहिल्यानें पहारेकरी पेटारे तपासून पाहत; पण अशी मिठाई रोज जाऊं लागली, तेव्हां रोजच्या रोज पेटारे काय तपासावयाचे आहेत? असें वाटून ते पुढें फारशी बारकाईनें चौकशी करीनातसे झाले. शिवाजीच्या जवळची सर्व मंडळी हळू हळू कांहींना कांहीं निमित्त करून तेथून निघून गेली आणि वेष पालटून आसपास राहिली. शेवटीं एके दिवशीं रात्रीं शिवाजी व संभाजी असे दोघेजण मिठाईच्या पेटाऱ्याबरोबरच्या दुसऱ्या दोन पेटाऱ्यांत बसून पहारेकऱ्याच्या हातांतून निसटले. पहारेकऱ्याला वाटलें कीं रोजच्या सारखे हे मिठाईचे पेटारे जात असतील.

ह्मणून त्यानें विशेष बारकाईनें तपास केला नाहीं. शिवाजीनें दगा दिला हें पाहारेकऱ्यास बऱ्याच वेळानें कळल्यावर त्यानें कोतवालास ती खबर कळविली, तेव्हां त्यानें घाबरून बादशहास ती कळविली. ती ऐकून बादशहा अगदीं चकित झाला, आणि त्यानें चारही दिशांना एकंदर दोन लक्ष साठ हजार स्वार शोधाला पाठविले. शिवाजी तर हातचा गेलाच; पण बादशहानें केलेल्या दगलबाजीमुळें जयसिंगासारख्या रजपुत सरदारांचाही बादशहावरचा विश्वास उडाला. शिवाजी येथेंच कोठें तरी गुप्त वेषानें राहिला असेल, आणि तो आपला केव्हां प्राण घेईल याचा नेम नाहीं, अशी बादशहाच्या मनाला रात्रंदिवस चिंता लागून राहिली.

शिवाजी आणि संभाजी पळाले ते प्रथम मथुरेस गेले. तेथें एका ब्राह्मणाचे घरीं संभाजीस ठेवून शिवाजीराजे आल्या वाटेनें न जातां मुद्दाम वाकड्या तिकड्या वाटेनें वेष पालटून यात्रा करीत करीत दिल्ली सोडल्यापासून दहा महिन्यांनीं परत राजगडास येऊन पोंहोंचले, व नंतर एक वर्षानें माणसें पाठवून त्यांनीं संभाजीस ब्राह्मण वेषानें सुखरूप परत आणिलें.

## गोष्ट १३ वी–जवानमर्द तानाजी मालुसरे.


—:o:—

दिल्लीहून परत आल्याबरोबर शिवाजीनें आपल्या हातचे गेलेले किल्ले परत मिळविण्याची तयारी चालविली.

पुरंदर आणि कोंडाणा हे दोन उत्तम किल्ले अगोदर काबीज करण्याचें ठरलें. शिवाजीनें आपला बाळमित्र आणि अत्यंत विश्वासू स्नेही तानाजी मालुसरे याचेकडे कोंडाणा किल्ला घेण्याची कामगिरी सोंपविली होती. तानाजीच्या घरीं त्याच्या मुलाच्या लग्नाची गडबड होती. तरी धन्याचा हुकूम होतांच लग्नाची तयारी तशीच बाजूस ठेवून तानाजी आपला भाऊ सूर्याजी व एक हजार मावळे यांना घेऊन काळोख्या रात्रीं किल्ल्याखालीं येऊन पोंचला. गडावर रजपूत शिपायांचा पक्का बंदोबस्त होता. तानाजीनें आपल्या लोकांच्या दोन टोळ्या केल्या. एक टोळी सूर्याजीच्या हाताखाली मागें मदतीकरितां ठेविली, व दुसरी आपल्याबरोबर घेतली. कल्याण दरवाजानें हल्ला करण्याचें ठरलें (कल्याण दरवाजाचें चित्र पहा.) प्रथम एक हुषार मावळा एका बिकट वाटेनें घोरपड लावून वर चढला, आणि तेथून खालीं सोडलेल्या दोरीनें तानाजी व तीनशें मावळे किल्ल्याच्या कोटांत उतरले. पण इतक्यांत गडावरच्या रजपुतांना त्यांची चाहूल लागून ते सावध झाले. तेव्हां त्यांची आणि मावळ्यांची फारच निकराची लढाई झाली. रजपुतांचा सरदार उदेभान व मावळ्यांचा सरदार तानाजी हे दोघे हातघाईवर आले. दोघांनीं लढण्याची शिकस्त केली, आणि अखेर दोघेही एकमेकांच्या हातून ठार झाले. तानाजी पडला हें पाहतांच मावळे घाबरून हटूं लागले; पण इतक्यांत मागून सूर्याजी आला.

त्यानें आवेश उत्पन्न होईल असें भाषण करून त्यांना परत फिरविलें आणि 'हर हर महादेव' असा जंगी घोष करून रजपुतांवर हत्यार चालविलें. जो हातीं सांपडला त्याची साफ कत्तल करून किल्ला घेतला, आणि पूर्वी ठरल्याप्रमाणें पागेस आग लावून किल्ला घेतल्याची शिवाजीस इषारत केली. शिवाजीनें राजगडावरून ती पाहिली, तेव्हां त्याला फार संतोष झाला. पण गडबडींत तानाजी पडला असें जेव्हां त्यास समजलें, तेव्हां त्याला अतिशय वाईट वाटलें आणि 'गड आला, पण सिंह गेला' असे उद्गार त्याचे तोंडून निघाले. यावरूनच पुढें कोंडाणा किल्ल्यास लोक सिंहगड ह्मणूं लागले असें कित्येकांचे ह्मणणें आहे. ज्यांनीं ज्यांनीं या युद्धांत समशेर गाजविली, त्यांना शिवाजीनें यथायोग्य बक्षिसें देऊन खुष केलें. ही गोष्ट इ. स. १६७० त घडली. जोंपर्यंत या जगांत मराठ्यांचा इतिहास कायम राहील, तोंपर्यंत तानाजीचें नांव या पराक्रमामुळें त्या इतिहासांत झळकत राहील. त्या वीराची योग्यताच तशी होती. असा मोहरा हरवल्याबद्दल शिवाजीला हळहळ वाटली यांत नवल काय?

कोंडाणा किल्ल्याचे मागून पुरंदर व दुसरे पुष्कळ किल्ले शिवाजीनें परत मिळविले; कोंकण, खानदेश, गुजराथ, वऱ्हाड वगैरे प्रांत घेतले; सुरत शहर दुसऱ्यांदा लुटलें; व चोंहीकडे दरारा बसविला. याप्रमाणें दिगंत कीर्ति केल्यावर मातुश्री जिजाबाई



ंच्या आज्ञेवरून शिवाजीनें काशीचे विद्वान् ब्राह्मण गागाभट्ट यांचे हातून क्षत्रियांच्या रीतीप्रमाणें मि. ज्येष्ठ शु० ३ शके १५९६ ( सन १६७४ ) रोजीं स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. *पंतप्रधान, पंतअमात्य, पंतसचिव, मंत्री, सुमंत, सेनापति, न्यायाधीश आणि पंडितराव अशा अष्ट प्रधानांच्या नेमणुका केल्या; 'राज्याभिषेक शक' नांवाचा नवा शक सुरु केला आणि आपल्या नांवाचें नाणें पाडलें. याला च 'शिवराई' ह्मणत. हा शिवराई पैसा पांच चार वर्षांपूर्वींपर्यंत पुण्यांत चालत असे. शिवाजीनें महाभारतांत सांगितलेल्या पद्धतीवर राज्याच्या बंदोबस्ताकरितां नवी व्यवस्था केली; मुसलमानी शब्दांचे ऐवजीं संस्कृत शब्द सुरू केले आणि जेणेंकरून प्रजेला सुख होईल असे नियम घालून दिले. राज्याभिषेकाचे वेळीं

* पंतप्रधान ( पेशवे ) हे मुख्य दिवाणगिरीचें काम करीत. पंत अमात्य मुलकी वसूल व हिशोब यांचें काम पहात. पंतसचिवाकडे राज्याच्या एकंदर दप्तराचें काम दिलें असे. मंत्री राजाचा खासगी कारभार पहात. सुमंत परराज्यांशीं पत्रव्यवहार करीत. सेनापतीकडे फौजेची व्यवस्था असे. न्यायाधीश तंट्याचा निकाल करीत आणि पंडितराव धर्मखात्यावरचे मुख्य अधिकारी असत. ह्मणजे राज्यकारभाराचे भाग पाडून एकेका भागाचें काम एकेका अधिकाऱ्याकडे सोपविणें ही जी इंग्रजांची हल्लींची उत्कृष्ट पद्धति तीच शिवाजीनें प्रथम घालून दिली होती. यावरून शिवाजी जसा शूर तसा राज्यव्यवस्थेंतही धोरणी व शहाणा होता असें ठरतें.

राजाचे डोक्यावर छत्र धरतात; त्यावरून यापुढें शिवाजीला 'श्री छत्रपति शिवाजी महाराज' असें नांव मिळालें.

## गोष्ट १४ वी–श्री छत्रपति शिवाजी महाराज.

शिवाजीस राज्याभिषेक झाल्यावर त्याच्या हातून कर्नाटकांतली मोहीम येवढीच विशेष महत्वाची गोष्ट घडली. या मोहिमीचें कारण असें होतें कीं, शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी याला शहाजीचा कर्नाटकांतला तंजावर वगैरे मुलूख मिळाला होता. त्यानें जर शिवाजीची कांहीं आगळीक केली नसती, तर शिवाजीही त्याच्या वाटेस गेला नसता. कारण शिवाजीनें महाराष्ट्रांत मोठें थोरलें राज्य स्वतःच्या हिंमतीवर मिळविलें होतें. ह्मणून त्याला बापाच्या जहागिरींतला वांटा मागण्याची इच्छा कधींच झाली नसती. पण व्यंकोजी शिवाजीचा प्रत्यक्ष भाऊ असतां तो त्याच्याविरुद्ध विजापूरकराला जाऊन मिळाला या आगळिकीबद्दल व्यंकोजीला चांगली शिक्षा करावी, आणि जातां जातां कर्नाटक प्रांत जिंकून आपलें राज्य वाढवावें, असे दोन्ही हेतु मनांत धरून शिवाजी कर्नाटकांत गेला, आणि व्यंकोजीपाशीं बापाच्या जहागिरीचा वांटा मागूं लागला. व्यंकोजी तो देईना. इतकेंच नाहीं, तर त्याच्या फौजेनें शिवाजीच्या फौजेवर चाल केली. तेन्हां लढाई जुंपून व्यंकोजीचा परा-

भव झाला. शेवटीं तो तहास कबूल झाला. शिवाजीनें त्याचें राज्य त्याला परत दिलें, आणि त्याबरोबर राज्याची व्यवस्था कशी ठेवावी व कोणाशीं कसें वागावें त्याविषयींचे नियमही घालून दिले. परत येतां येतां शिवाजीनें कर्नाटकांतला कांहीं मुलूख जिंकला.

शिवाजीची खोड मोडण्याचा विचार औरंगजेब बादशहाच्या डोक्यांतून अद्याप गेला नव्हता. त्यानें दिलेलखान, रणमस्तखान वगैरे मोठमोठ्या सरदारांस गोवळकोंड्यावर पाठवून लढाईचा प्रसंग पुनः आणिला. संगमनेरापाशीं त्यांची जंगी लढाई झाली. तींत कित्येक मराठे सरदार पडले. तरी शिवाजीनें अखेरीस मोठी शिकस्त करून जय मिळविला.

शिवाजीचा बहुतेक जन्म लढाया करण्यांतच गेला. या सगळ्या लढाया परक्यांशीं झाल्या होत्या; त्यांत शिवाजीकडचा कोणी माणूस शत्रूला फितुर झाला असें क्वचित्च घडलें असेल. पण आतां प्रत्यक्ष त्याचा मुलगा संभाजीच वाईट नादास लागून दिलेलखानास जाऊन मिळाला, तेव्हां शिवाजीला किती वाईट वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. त्यानें मुलाची समजूत घालून त्याला परत आणण्यासाठीं माणसें पाठविलीं होतीं. संभाजी दिलेलखानाला जाऊन मिळाला यांत शिवाजीचा कांहीं तरी गूढ हेतु असला पाहिजे असा बादशहाला संशय येऊन त्यानें खानास ठपका दिला.

त्यावरून खान रागावला, आणि त्यानें संभाजीस परत जाऊं दिलें. यापुढें शिवाजीनें संभाजीला मोकळा न राहूं देतां पन्हाळगडावर विश्वासू माणसांच्या देखरेखीखालीं ठेविलें होतें.

जे शिवाजीच्या वाटेस जात त्यांना तो उपद्रव देई; सुरतेचे इंग्रज व्यापारी त्याच्या वाटेस कधीं गेले नाहींत, ह्मणून त्यानेंही त्यांचें नुकसान कधीं केलें नाहीं.

शिवाजीला साधुसंतांचें दर्शन घ्यावें, व त्यांचा उपदेश ऐकावा या गोष्टींचा नाद लहानपणापासूनच असे. दोन प्रसिद्ध साधुपुरुष त्याच्या कारकीर्दीत झाले, आणि त्या दोघांच्या दर्शनाला तो वारंवार जात असे. साधु तुकाराम यांना आपल्या येथें आणण्यासाठीं त्यानें अब्दागीर, घोडा, कारकून वगैरे सरंजाम पाठविला होता, पण त्या साधूला हा थाटमाट न आवडून त्यानें येण्याचें नाकारलें. त्या वेळीं त्यानें केलेले 'दिवट्या छत्री घोडे। हें तों बऱ्यांत न पडे,' 'मुंगी आणि राव। आम्हां सारखाच जीव' वगैरे निस्पृहपणाचे अभंग प्रसिद्ध आहेत. समर्थ रामदास स्वामींच्या उपदेशाचा त्याच्या मनावर फार परिणाम झाला होता. मराठे तेवढे जमाकरावे, त्यांच्यांत आपलेपणा उत्पन्न करावा, हिंदुधर्माचा अभिमान धरावा, आणि मराठी स्वराज्य स्थापावें, या शिवाजीच्या कल्पनेस रामदासाकडून नेहमीं उत्तेजन मिळत गेलें. आपण राज्य मिळविलें तें या उपदेशामुळेंच असें वाटून शिवाजीनें एके वेळीं तें

राज्य समर्थांस अर्पण केलें होतें; पण त्यांनीं तें न घेतां शिवाजीलाच तें आपल्या नांवानें चालविण्यास सांगितलें व आपली खूण ह्मणून मराठी राज्याच्या जरीपटक्याचा रंग भगवा ठेवण्याची आज्ञा केली असें ह्मणतात.

शिवाजीमहाराजांची आई जिजाबाई इ. स. १६८० त मेली. राज्यकारभाराची दगदग व काळजी, आणि संभाजीच्या वाईट वर्तनामुळें मनास झालेलें दुःख यांच्या योगानें शिवाजीमहाराजांचें शरीर अगदीं झिजून गेलें होतें. त्यांत आणखी आईबद्दलच्या शोकाची भर पडली. शेवटीं गुडघी नांवाचा रोग होऊन चैत्र शु. १५ शके १६०२ ( ताः ५ एप्रिल १६८० ) रोजीं त्यांस रायगड येथें देवाज्ञा झाली. तेथें त्यांची समाधी आहे (चित्र पहा). त्यांना संभाजी व राजाराम असे दोन मुलगे होते. पैकीं संभाजी वडील होता. तो त्यांच्यामागून गादीवर बसला.

शिवाजी महाराज मरण पावले, तेव्हां त्यांचे खजिन्यांत नऊ कोट रुपये रोख, ५१००० तोळे सोनें, २०० तोळे माणकें, १०० तोळे मोत्यें, ५०० तोळे हिरे व दुसरी पुष्कळ संपत्ति होती.

शिवाजी महाराजांचे अंगीं खरा देशाभिमान, शौर्य, समयसूचकता, धर्माचे ठायीं श्रद्धा, वडीलमाणसांविषयीं आदर, व गुणी माणसांविषयीं प्रीति, इत्यादि गुण होते. ते नेहमीं नीतीनें चालत. यामुळें व त्यांनीं केलेल्या अलौकिक कृत्यांमुळें लोक अजून त्यांना फार पूज्य समजतात.

कित्येक लोक तर त्यांना प्रत्यक्ष सांबाचा अवतार मानतात. येवढें अगदीं खरें कीं साऱ्याजगाच्या इतिहासांत शिवाजी महाराजासारखीं माणसें फारच थोडीं आढळतील.

---

## गोष्ट १५–छत्रपति संभाजी.

### ( इ. स. १६८०–१६८९ )

'सूर्याचे पोटीं शनीश्वर' तसा शिवाजीच्या पोटीं संभाजी उत्पन्न झाला होता. बाप जिवंत असतांच तो मुसलमानांना जाऊन मिळाला होता, ह्मणून त्याला परत आणिल्यावर शिवाजीनें त्याला पन्हाळा किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेविलें होतें. शिवाजीच्या मागें त्याच्या गादीवर धाकटा मुलगा राजाराम यास बसविण्याविषयींची खटपट राजारामाची आई सोयराबाई हिनें केली होती, पण ती तडीस गेली नाहीं. संभाजी पन्हाळ्यावरून निघून रायगडास आला, आणि राजारामाच्या पक्षाचे जेवढे लोक हातीं लागले, तेवढ्यांना त्यानें कैदेंत टाकलें व त्यांस हालहाल करून मारलें. शिवाजी महाराजांच्या अत्यंत विश्वासांतलीं आणि स्वराज्यासाठीं जीव देण्यास तयार अशीं कांहीं माणसें संभाजीनें या वेळीं क्रूरपणानें मारून टाकलीं. सोयराबाई त्याची सावत्र आई, पण तिलाही त्यानें भिंतींत चिणून मारलें. संभाजी शूरपणांत कमी होता असें नाहीं. तो

नीट चालीनें चालता, आणि हाताखालच्या लोकांना चांगलें वागविता, तर निदान बापानें मिळवून ठेविलेलें राज्य तरी नीट संभाळून राहता. पण तेवढेंही त्याच्या हातून घडलें नाहीं. त्याला नानातऱ्हेचीं व्यसनें जडलीं. संगतिही व्यसनी लोकांचीच मिळाली व व्यसनी व मूर्ख अशा लोकांच्याच हातीं त्यानें राज्याचा कारभार दिला. त्यामुळें जरी लोकांच्या अंगीं स्वराज्याविषयींचा अभिमान आणि कर्तृत्व होतें, तरी त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. संभाजीचा मुख्य प्रधान कलुशा नांवाचा एक कनोजा ब्राह्मण होता. हा मंत्रतंत्र करणारा, व्यसनी, आणि हलकट होता. शिवाजी महाराजांनीं येवढें राज्य वाढविलें ही त्यांनीं मोठी चूक केली असें सांगून तो संभाजीला भलभलती सल्ला देत असे, आणि संभाजी त्याच्या ओंजळीनें पाणी पीत असे. इकडे औरंगजेब बादशहा मराठी राज्य बुडविण्याच्या संधीची वाटच पाहत होता. तेवढ्यासाठीं तो मोठी फौज घेऊन स्वतः दक्षिणेंत आला होता. संभाजीनें एकदां मोंगल सैन्याचा चांगलाच समाचार घेतला, पण पुढें राज्याची जशी नीट व्यवस्था ठेवावयास पाहिजे होती तशी ठेविली नाहीं. यामुळें औरंगजेबाला फावलें. संभाजी संगमेश्वर येथें आपल्या सोबत्यांसह गैरसावध राहिला आहे असें पाहून एका मोंगल सरदारानें छापा घालून त्याला व कलुशा प्रधानाला पकडलें, आणि तुळापूर येथें बादशहाचे समोर नेऊन उभे केलें. ‘तूं


मुसलमान होशील तर तुला जिवंत सोडतों' असें बादशहानें संभाजीला ह्मटलें. त्यावर बादशहाला चीड येण्यासारखें संभाजी कांहीं बोलला. त्यावरून बादशहानें हालहाल करून त्याला ठार मारविलें. ही गोष्ट इ. स. १६८९ त घडली. मनुष्य कितीही शूर आणि धैर्यवान् असला, तरी वाईट व्यसनाचे व वाईट संगतीचे पायीं त्याचा कसा नाश होतो याला उत्कृष्ट उदाहरण संभाजीचें आहे. बाप किती थोर, त्यानें केवढें नांव मिळविलें होतें! आणि त्याचाच मुलगा संभाजी पहा कसा दिवटा निघाला!

संभाजीची बायको येसूबाई ही फार हुषार होती, पण संभाजी तिचें ऐकेना. संभाजी मारला गेला, तेव्हां ती व तिचा मुलगा शिवाजी हीं रायगडावर होतीं. तींही लवकरच मोंगलांचे हातीं लागलीं. पण औरंगजेबाची मुलगी बेगम झेबउन्निसा हिचा त्या मुलावर चांगला लोभ जडल्यामुळें त्यांच्या जिवाला बिलकुल धक्का लागला नाहीं. बेगमेनें त्यांना फार ममताळूपणानें वागविलें.


## गोष्ट १६ वी—छत्रपति राजाराम.

### ( इ. स. १६८९–१७०० )

संभाजी मारला गेल्यावर त्याचा मुलगा शिवाजी याच्या नांवानें राज्य चालवावें असा विचार चालला होता.



श्री शिवाजी महाराज यांची समाधी.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ..........

[illegible]

पण पुढें तोही मोगलाच्या हातीं लागला, तेव्हां चार शहाण्या पुरुषांच्या सल्ल्यानें असें ठरलें कीं संभाजीचा धाकटा भाऊ राजाराम यानें मराठेशाहीची गादी कर्नाटकांत न्यावी व तेथें राहून गेलेलें राज्य परत मिळविण्याची खटपट करावी. त्याप्रमाणें राजाराम चंदीचंदावरास जाण्यासाठीं चार शहाणीं व विश्वासाचीं माणसें घेऊन निघाला. कोणीं ओळखूं नये ह्मणून सर्वांनीं कापडी, जंगम, यात्रेकरू वगैरेचे वेष घेतले होते. जातां जातां बेंगरूळ येथें धर्मशाळेंत मुक्कामास मंडळी उतरली. दुसरेही कांहीं वाटसरू तेथें उतरले होतेच. त्यांना या मंडळीचा संशय आलासें दिसतांच राजारामाबरोबरच्या विश्वासू माणसांनीं त्याला सांगितलें कीं, ‘ आतां येथें राहण्यांत धोका आहे. तुह्मीं आतां वाट फुटेल तिकडे लवकर जावें; आह्मीं इकडचें पाहून घेतों. ’ तेव्हां कांहीं मंडळी राजारामाबरोबर गेली व कांहीं मागें राहिली. मागें राहिलेल्यांस मोंगल अधिकाऱ्यांनीं फार छळलें, हाणलें व मारलें; त्यांनीं सगळ्या हालअपेष्टा मुकाट्यानें सोसून घेतल्या, पण आपण खरोखर कोण व राजाराम कोणीकडे गेला त्याचा पत्ता लागूं दिला नाहीं !

राजाराम चंदीस ( जिंजीस ) सुखरूपपणें पोंचल्यावर त्यानें तेथें गादीची स्थापना करून अष्ट प्रधान नेमिले, व इनामें, जहागिरी, बक्षिसें वगैरेची लालूच लावून पुष्कळ चांगलीं शूर माणसें जमा केलीं. इकडे ज्या मराठे सरदा-

रांना राजारामानें मागें महाराष्ट्रांत ठेविलें होतें, त्यांतल्या कित्येकांनीं जिवावर उदार होऊन मोठे अलौकिक पराक्रम केले. धनाजी जाधव यानें तर आपला दरारा मुसलमानांवर इतका बसविला कीं घोडा पाणी पीत नाहींसा झाला तर मोगल स्वारानें त्याला ह्मणावें, 'क्यूँ बेटा, तेरेकू पानीमे धनाजी दिखता है?' संताजी घोरपडे यानें तर प्रत्यक्ष बादशहाच्या तंबूवर छापा घालून त्याचे कळस काढून आणिले होते. इकडे हे दोघे व दुसरे सरदार बादशहास बेजार करीत असतां तिकडे कर्नाटकांत बादशहाच्या झुल्फिकारखान नांवाच्या सरदारानें चंदीच्या किल्ल्यास वेढा दिला. कसेंही करून तो किल्ला घेतलाच पाहिजे असा बादशहाचा त्या सरदारास सक्तीचा हुकूम होता. ह्मणून फार शिकस्त करून त्यानें तो किल्ला घेतला, पण राजाराम त्यापूर्वींच तेथून युक्तीनें निघून गेला होता.

राजाराम चंदीहून निघाला तो साताऱ्यास आला, आणि तेथें त्यानें गादीची स्थापना केली. तेव्हांपासून सातारा हें मराठेशाहीच्या गादीचें मुख्य ठिकाण झालें. याच सुमारास धनाजी जाधव व संताजी घोरपडे या दोन वीरांत द्वेष वाढून त्याचा परिणाम असा झाला कीं संताजी मारेकऱ्याकडून मारला गेला. आपापसांतला द्वेष नाशाला कसा कारण होतो पहा! संताजीसारखा हिरा निष्कारण नाहींसा झाला. साताऱ्यास आल्यावर राजारामानें स्वतः बरोबर फौज घेऊन मोगलांवर स्वाऱ्या केल्या, आणि गेलेल्यापैकीं पुष्क-

ळ मुलूख परत मिळविला. याप्रमाणें मराठ्यांवर संकटें आलीं असतांही त्यांनीं न डगमगतां एकीच्या, धैर्याच्या, खऱ्या देशाभिमानाच्या, शौर्याच्या आणि युक्तीच्या जोरावर मराठेशाहीचें नांव कायम राखलें. राजारामाला आणि त्या वेळचे मराठे वीर, सरदार, मुत्सद्दी आणि अधिकारी यांना फार कष्ट सोसावे लागले. पण शिवाजी महाराजांनीं मिळविलेलें स्वराज्य बुडूं द्यावयाचें नाहीं, व मराठ्यांच्या कीर्तीला कलंक लागूं द्यावयाचा नाहीं, यासाठीं त्यांनीं ते सगळे कष्ट मुकाट्यानें सोसले, आणि मराठ्यांचें नांव पुनः उदयाला आणिलें. राजाराम ताप येऊन एकाएकीं वारला ( इ. स. १७०० ). त्याला चार बायका होत्या. पैकीं ताराबाईला शिवाजी नांवाचा आणि राजसबाईला संभाजी नांवाचा मुलगा होता.

## गोष्ट १७ वी–छत्रपति दुसरा शिवाजी.
## ( इ. स. १७००–१७०८ )

राजाराम मेल्यानंतर मराठी राज्याला पुनः कांहीं काळपर्यंत वाईट दिवस आले. राजारामाचे मागें गादीवर कोणीं बसावें याविषयीं मराठ्यांत तंटा लागला होता. संभाजीचा मुलगा शिवाजी ( याला औरंगजेबानें शाहू अथवा साव ह्मणजे गरीब असें नांव दिलें होतें. ) याला सोडवून आणून गादीवर बसवावें असा कित्येक मराठे सरदारांचा विचार होता. पण राजारामाची बायको ताराबाई हिला

आपला मुलगा शिवाजी याला गादी मिळावी असें वाटत होतें. शेवटीं ताराबाईनें हट्ट चालवून आपल्या मुलाला राज्याभिषेक करविला. इकडे औरंगजेब बादशहानें ही संधी साधून कांहीं किल्ले काबीज केले. पण डोंगरी किल्ले घेणें मुसलमानांना जितकें सोपें गेलें तितकेंच ते संभाळणें कठीण गेलें. त्यांनीं एकेक किल्ला घेऊन पुढें जावें, तों मागून मराठ्यांनीं येऊन आपला किल्ला परत घ्यावा असें चाललें, तेव्हां बादशहा अगदीं जेरीस आला. तो पुढें सन १७०७ सालीं लवकरच अहमदनगर येथें मरण पावला.

औरंगजेब मेल्यावर त्याच्या मुलानें कांहीं करारावर शाहूला सोडलें व मोगलांची ताबेदारी पतकरून शाहू दक्षिणेंत आला. 'माझें राज्य मला परत द्या' असा त्यानें ताराबाईला निरोप पाठविला, पण ती बऱ्या बोलानें त्याला राज्य देईना. शेवटीं लढाईचा प्रसंग आला. ताराबाईनें शाहूशीं लढण्याकरितां कांहीं सरदारांना पाठविलें होतें. त्यांपैकीं दोघे सरदार त्याला जाऊन मिळाले. तेव्हां तिचें काय चालतें? शाहूनें साताऱ्यावर चाल करून तें राजधानीचें मुख्य ठिकाण घेतलें. तेव्हां ताराबाई पळून गेली, आणि इ. स. १७०८ त शाहूला राज्याभिषेक झाला.

ताराबाई साताऱ्याहून निघाली ती कोल्हापुरास गेली. व तेथें तिनें नवें राज्य स्थापून त्या राज्याच्या गादीवर आपल्या मुलाला बसविलें. तेंच कोल्हापूरचें राज्य झालें. मूळचें साताराचें राज्य आज नाहीं, पण सुदैवानें त्याची



ਮਾਤਾ [illegible] ਜੀ



श्री शाहू महाराज.

शाखा ह्मणजे कोल्हापूरचें राज्य अजून कायम आहे. अर्थात् येथील राजेही श्रीशिवाजी महाराजांच्याच वंशांतले आहेत व ते आपणांस 'छत्रपति' ह्मणवितात.

याप्रमाणें आतांपर्यंत दक्षिणेंत मराठ्यांचें एकच राज्य होतें. तीं यापुढें दोन निरनिराळीं झालीं. कोल्हापूरचा छत्रपति शिवाजी (ताराबाईचा मुलगा) इ. स. १७२० त मेला, तेव्हां त्याच्यामागें त्याचा सावत्रभाऊ संभाजी कोल्हापूरच्या गादीवर बसला; आणि शिवाजीला रामराजा नांवाचा एक मुलगा होता तो सातारचा शाहू राजा वारल्यानंतर त्याच्या स्त्रीच्या मांडीवर दत्तक देण्यांत आला. याप्रमाणें सातारा आणि कोल्हापूर या दोन्ही गादींवर श्रीशिवाजीमहाराज यांच्याच वंशांतले पुरुष बसले.

## गोष्ट १८ वी–छत्रपति शाहू.
## ( इ. स. १७०७–१७४८ )

ताराबाईनें निराळें राज्य स्थापिलें, तरी तेवढ्यानें भाऊबंदकीचें भांडण मिटलें नाहीं. ताराबाईचीं शाहूच्याविरुद्ध कारस्थानें चाललींच होतीं. शाहूही कोल्हापुराकडे मधून मधून फौज घेऊन जात असे. शाहू साताऱ्याकडे असला ह्मणजे ताराबाई व तिच्या पक्षास मिळालेले निंबाळकर, अमात्य, आंग्रे, सचिव, सावंत वगैरे मराठे सरदार कोल्हापुराकडे दंगा करीत; आणि शाहू तिकडे गेला, ह्मण ते साताऱ्याकडे त्रास देत असें चाललें होतें. य

ऊबंदकीच्या भांडणाचे पायीं मराठ्यांची शक्ति निष्कारण खर्च झाली. हेच मराठे एकोप्यानें वागते तर त्यांनीं खुद्द दिल्लीच्या बादशहाला जिंकलें असतें. पण अमकें अमकें असें असतें ह्मणजे अमकें अमकें झालें असतें असें आतां ह्मणून उपयोग काय ?

शाहूचा सेनापति धनाजी जाधव हा याच वेळीं मरण पावला. हा मोठा शूर, इमानी, खरा शिपाई होता. मागें राजारामाच्या वेळेस हा व संताजी घोरपडे या दोघांनीं मराठेशाहीची बाजू उत्कृष्ट राखली होती. शाहूला राज्याभिषेक झाल्यावर त्यानें धनाजीकडे वसूल खात्यावर देखरेख करण्याचें काम दिलें होतें. धनाजीनें या कामासाठीं दोन हुषार कारकून ठेविले होते. त्यांतला एक लवकरच प्रसिद्धीला आला. त्याचें नांव बाळाजी विश्वनाथ भट्ट. हाच पेशव्यांचा मूळ पुरुष. हा मूळचा जंजिरा संस्थानांत श्रीवर्धनगांवचा राहणारा. त्याच्या भावाचें आणि जंजिऱ्याच्या शिद्दीचें वाकडें येऊन शिद्दीनें त्याला पोत्यांत घालून समुद्रांत बुडविलें. त्या दहशतीनें बाळाजी तेथून पळाला, व वेळासचे भानु आडनांवाचे त्याचे सोबती होते त्यांना घेऊन कोंकणांतून साताऱ्यास आला. भट्ट हे पुढें पेशवे झाले, आणि त्यांच्या बरोबर भानु हे फडणीस झाले. या भानु घराण्यांत प्रसिद्ध मुत्सद्दी नानाफडणीस हे पुढें उदयास आले. भट्ट व भानु या घराण्यांचा मराठेशाहीशीं अखेरपर्यंत अगदीं निकट संबंध राहिला. याविषयींची हकी-

कत या इतिहासाच्या दुसऱ्या भागांत येणारच आहे.

बाळाजी धनाजी जाधवाजवळ कारकुनीच्या कामावर होता; तथापि आपल्या अंगच्या हुशारीमुळें त्यानें धन्याजवळ इतकें वजन पाडिलें होतें कीं महत्वाच्या राजकारणांत धनाजी बाळाजीच्या विचारानें वागत असे. धनाजी शाहूच्या पक्षाला मिळण्याला बाळाजीच कारण झाला होता, व पुढें धनाजीचा मुलगा चंद्रराव व दुसरे सरदार ताराबाईला मिळाले, तेव्हां बाळाजीनेंच शाहूची बाजू संभाळली. शाहूचीही मर्जी त्याच्यावर अर्थातच बसली. बाळाजीला 'पेशवे' हें पद मिळालें, आणि राज्याचा सगळा कारभारही त्याच्या हातीं आला.

शाहू लहानपणापासून बादशहाच्या जनानखान्यांत वाढला होता. यामुळें खावें, प्यावें व चैन करावी, अशा प्रकारच्या संवयी त्याला लहानपणापासून लागल्या होत्या. राज्यकारभाराची दगदग त्याच्यानें होत नसे, आणि चांगला कारभार करण्यासारखी विशेषशी हुशारीही त्याच्या अंगीं नव्हती. यामुळें बाळाजी विश्वनाथासारखा हुषार व चतुर मनुष्य मिळाल्याबद्दल शाहूला संतोष वाटला आणि त्यानें हळू हळू राज्यकारभारांतून आपलें मन काढून सगळी जोखीम बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचेवर टाकिली. बाळाजीनेंही आपलें काम चोख बजाविलें. बाळाजीचे नंतर 'पेशवे' हें पद त्याच्याच वंशजाकडे राहि[ले] व कारभारही तेच करीत आले. या कारभाराची म[...]

'पेशवाईची हकीकत' या पुस्तकांत येईल. ती वाचावी.

शाहूमहाराज इ. स. १७४९ त मरण पावले. यांना मूलबाळ कांहीं नव्हतें. ह्मणून ताराबाईचा नातू ( दुसऱ्या शिवाजी राजाचा मुलगा ) रामराजा याला दत्तक घेऊन त्याच्या नांवानें राज्याचा कारभार सुरू करण्यांत आला. ताराबाईच्या मनांत नातवाच्या नांवानें आपण स्वतःच राज्य चालवावें असें होतें. पण पेशव्यापुढें तिचें चालेना. तेव्हां तिनें आपल्या मदतीसाठीं गाइकवाडाला बोलाविलें. गाइकवाड आले. पण पेशव्यांनीं त्यांनाच अटकेंत ठेविलें. तेव्हां ताराबाईचा उपायच खुंटला. शेवटीं ती स्वस्थ बसली. ही बाई इ. स. १७६१ त मरण पावली.

शाहू महाराजाचे कारकीर्दींत बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ ऊर्फ पहिले बाजीराव व बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब असे तीन पेशवे झाले.

## गोष्ट १९ वी छत्रपति शाहूचे वंशज.

शाहू महाराजांचे मागून जे राजे सातारच्या गादीवर बसले ते बहुतेक नांवाचे राजे होते. त्यांच्या हातीं अधिकार असा मुळींच नव्हता. सगळा अधिकार पेशव्यांचे हातीं असे. पेशवे सांगतील त्याप्रमाणें त्यांना वागावें लागे. शिवाजी महाराजांच्या व राजाराम महाराजांच्या वेळेस जो मनुष्य शूर, व्यवहाराचे कामीं हुषार व इमानी असे, त्यासच पेशव्याचें पद मिळे, आणि त्याला राजाच्या

हुकुमानें चालावें लागे. पण शाहू महाराजाच्या वेळेपासून ही चाल बंद पडली आणि बाळाजी विश्वनाथाच्या घराण्यांतल्या पुरुषांनाच वंशपरंपरेनें पेशवे पद मिळूं लागलें. पेशव्यांच्या प्रमाणें इतर प्रधानांच्याही नेमणुका या वेळीं कायमच्या होऊन बसल्या. शिवाय पेशव्यांनीं पुणें हें आपलें राहण्याचें ठिकाण केल्यामुळें राज्यकारभाराच्या सगळ्या गोष्टी तेथेंच होऊं लागल्या. अर्थातच पुणें लवकर भरभराटलें, आणि सातारा शहर मागें पडलें. यापुढें सातारा ही मराठेशाहीची नुसती नांवाची राजधानी राहिली; पण खरी राजधानी पुणें ही झाली. एक पेशवा मेला, आणि नवा मनुष्य त्याचे जागीं यावयाचा झाला, ह्मणजे साताऱ्याच्या राजानें त्याला मानाचीं वस्त्रें द्यावयाचीं येवढा काय तो मान शाहूमहाराजाचे वंशाकडे राहिला. बाकी खरी सत्ता सगळी पेशव्यांच्या हातांत गेली. असो.

शाहू महाराजाचे मागून रामराजे गादीवर बसले. यांनीं राज्यकारभारांत मुळींच लक्ष घातलें नाहीं. हे इ. स. १७७७ त मेले. यांचे वेळेस बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब आणि त्यांचे मुलगे थोरले माधवराव व नारायणराव असे तीन पेशवे झाले.

रामराजाचे मागून त्याचा मुलगा दुसरा शाहू हा गादीवर बसला. याचे वेळेस सवाई माधवराव हे पेशवे होते. या दुसऱ्या शाहू महाराजाची कारकीर्द अतिशय धामधुमीची झाली. नानाफडणीस, महादजी शिंदे, सखाराम

बापू, अहल्याबाई होळकरीण, वगैरे मोठमोठीं माणसें याच कारकीर्दींत झालीं. मराठे सरदारांत आपआपसांत भांडणें लागून मराठी राज्याच्या इमारतीचा पाया याच वेळीं खचला; आणि पुढें लवकरच त्या राज्याचा जो नाश झाला, त्याला सुरुवात याच वेळीं झाली. हे दुसरे शाहू महाराज इ. स. १८०८ सालीं वारले. त्यांच्या मागून त्यांचा मुलगा प्रतापसिंह हा गादीवर बसला.

हे प्रतापसिंह ऊर्फ बुवासाहेब महाराज हुषार, सगळी स्थिति जाणणारे आणि चतुर होते. पण त्यांच्या हातीं कांहींच अधिकार नव्हता, आणि या वेळीं दुसऱ्या बाजीरावासारखा नालायक मनुष्य पेशव्याचे पदावर होता. यामुळें इ. स. १८१८ त मराठी राज्याचा अंत झाला. इंग्रजांनीं मराठी राज्य घेऊन पेशव्यांना वर्षाची आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून दिली, आणि प्रतापसिंह महाराजाकडे चौदा लक्षांचा मुलूख ठेविला.

प्रतापसिंह महाराजांनीं आपल्या मुलुखाचा कारभार कांहीं दिवस चांगल्या रीतीनें चालविला. पण पुढें त्यांच्या विषयीं इंग्रज सरकारला संशय येऊन त्यांनीं इ. स. १८३९ त प्रतापसिंहास गादीवरून काढून टाकिलें व त्यांचा भाऊ शहाजी ऊर्फ अप्पासाहेब यास गादीवर बसविलें. पुढें सन १८४८ या वर्षी अप्पासाहेब निपुत्रिक वारले. तेव्हां इंग्रजांनीं साताराचें सगळेंच राज्य आपलेकडे घेतलें.

REFBK-0000383

# केवळ मुलांमुलींसाठीं

सचित्र मासिक पुस्तक. **] आनंद [** वर्गणी ट. सह बारा

यांत लहान लहान गोष्टी, सुंदर कविता, पुराणांतल्या कथा, ऐतिहासिक गोष्टी, सोपे शास्त्रीय विषय, मुलांना शोभेल असा विनोद, गमतीचीं व माहिती देणारीं चित्रें, इ. विषय येतात.

## अभिप्राय.

**केसरी**—' सदर मासिकाचें बाह्यांग व अंतरंग मुलांचें मन आकर्षण करून त्यांस बोध करण्यासारखें आहे. '

**सुधारक**—' पुस्तक मुलांस व मुलींस संग्राह्य वाटेल. '

**बडोदावत्सल**—' पुस्तकाचें अंतरंग व बाह्यांग यांत आनंदी आनंद आहे. '

**विहारी**—' आनंद ' हा विद्यार्थ्यांना खरोखर आनंद दिल्याशिवाय राहणार नाहीं.

**सरदेसाईविजय**—' आपल्यांचा आनंद ' बालमंडळीला हंसवील, रिझवील, त्यांना गमतीचीं चित्रें दाखवून करमणूक करील.... आनंदरावासारखा उत्तम सोबती मुलांना मिळाल्यास त्यांना चांगलें वळण लागेल. ''

**सुबोधपत्रिका**—' महाराष्ट्रांतील सर्व मुलांचे हातीं ' आनंद ' गेला पाहिजे.

**देशसेवक**—' हें पुस्तक मुलांस आवडतें होईल. '

**मासिक मनोरंजन**—' केवळ लहान मुलांकरितां आजपर्यंत मराठींत एकही मा. पु. नव्हतें. आनंद ती उणीव भरून काढील.

पत्ता—म्यानेजर ' आनंद '
घर नंबर ६३८ सदाशिवपेठ पुणें.